रायगड, गुरुवार, दि. १४ ऑगस्ट २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

# लालपरीला 'ब्रेक'



## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भोंगळ कारभाराचा फटका

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

**अलिबाग-रोहा, अलिबाग-रेवदंडा, भाकरवड-देहेन जिल्ह्यातील सहाण, सुडकोली, देहेन या तीन पुलांसह तीन स्लॅब कलवर्ट धोकादायक असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. या पुलांवरून अवजड वाहतुकीला बंदी केली आहे. त्यामध्ये सर्वसामान्यांची वाहिनी म्हणून ओळखली जाणाऱ्या एसटी बसचीदेखील या पुलांवरून वाहतूक बंद केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह, प्रवासी, व सणासुदीमध्ये गावी येणाऱ्या चाकरमान्यांचे प्रचंड हाल होत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भोंगळ कारभाराचा फटका प्रवाशांना बसत आहे.**

अलिबाग-रोहा मार्गासह अलिबाग-रेवदंडा मार्गावरील पुल जुने झाले आहेत. या पुलावर दरवर्षी पावसाळ्यापूर्वी फलक लावून वाहने सावकाश चालविण्याचे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केले जाते.

दरवर्षी पावसाळ्यात हा खेळखंडोबा सार्वजनिक बांधकाम विभागाचा सुरू असतो. परंतु पावसाळ्यापुर्वी नादुरुस्त पूल दुरुस्त करून ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग उदासीन ठरला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्ह्यातील महत्वाच्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट पावसाळ्यात करून सर्वसामान्यांना वेठीस धरले असल्याची पान २ वर

> **पावसाळ्यापूर्वी धोकादायक पुलाजवळ फलक लावले जातात. पूल कमकूवत आहे, वाहने सावकाश चालवा असे आवाहन केले जाते. दरवर्षी फलक लावण्याऐवजी त्या पुलांची दुरुस्ती केली असती, तर आताही समस्या निर्माण झाली नसती. सणासुदीचा हंगाम सुरू झाला आहे. पुलावरून एसटी सेवा बंद झाली आहे. एसटीतून प्रवास करणाऱ्यांमध्ये महिला, ज्येष्ठ नागरिकांची संख्या प्रचंड आहे. त्यामुळे याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.**
> **अमित म्हात्रे - सामाजिक कार्यकर्ते**

### पर्यायी रस्त्यावरील पूल धोकादायक

**अलिबाग तालुक्यातील सहाण-नागाव मार्गावरील पाल्हे हा पुल स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये अवजड वाहतुकीसाठी धोकादायक ठरला आहेत. तसेच अलिबाग - रेवदंडा मार्गावरील नवेदरपूलाचादेखील यामध्ये समावेश आहे. नवेदर बेली येथील पूल धोकादायक ठरविल्याने एसटी महामंडळाने पर्यायी रस्ता म्हणून सहाण- पाल्हे मार्गावरून बसेस सुरु ठेवण्याची सूचना विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आली आहे. मात्र पर्यायी रस्त्यावरील सहाण बायपास येथील पाल्हे पुलच धोकादायक आहे, याबाबत एसटी महामंडळ रायगड विभाग अनभिज्ञ असल्याचे समोर आले आहे.**

# एसटीचे वेळापत्रक कोलमडले

## कर्मचारी कमतरतेचा फटका

उदय सावंत

। महाड ।

मुंबई-गोवा महामार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या महाड शहरातील एसटी आगाराचे गणित सध्या कोलमडले आहे. महाड एसटी आगाराला मंजूर पदांपेक्षा अनेक पदे रिक्त असल्याने एसटीच्या वेळापत्रकावर परिणाम झाला आहे. या कोलमडलेल्या गणिताला सावरण्यासाठी ऐन गणेशोत्सवात पुरेसा कर्मचारी वर्ग असणे गरजेचे आहे.

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असून या गणेशोत्सवाला कोकणातील लाखो गणेशभक्त आणि चाकरमानी कोकणात दाखल होतात. कोकणात येण्याकरता विशेष गाड्यांची सुविधा केली असली तरी अनेकजण एसटीचाच पर्याय स्वीकारतात. या गणेशोत्सवामध्ये गणेशभक्तांना परतीच्या प्रवासाला मात्र एसटीच्या कोलमडलेल्या वेळापत्रकाचा सामना करावा लागणार आहे.

महाड एसटी आगारामध्ये निम्म्याहून अधिक कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत. याचा परिणाम एसटीच्या फेऱ्यांवर होत असून अनेक गाड्या रद्द करण्याची वेळ महाड एसटी आगारावर आली आहे. गेले अनेक दिवसांपासून महाड-मुंबई सेंट्रल या गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या. त्यातच लांब पल्ल्यासाठी जाणाऱ्या गाड्यादेखील बंद ठेवल्या. महाड एसटी आगारांमध्ये चालक, वाहक, सफाई कर्मचारी, वाहतूक निरीक्षक अशा अनेक पदांमधील जागा रिक्त आहेत. गणेशोत्सवामध्ये अशीच परिस्थिती कायम राहिली तर उर्वरित कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण निर्माण होणार आहे.

गणेशोत्सवामध्ये एसटी महामंडळाच्या आगारांकडून एसटीचे उत्पन्न वाढीसाठी विशेष प्रयत्न केले जातात. महाड एसटी आगारदेखील यामध्ये मागे नाही. महाड तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये समूह आरक्षण करून एसटी बसेस थेट गावातच जाऊन प्रवाशांना मुंबई-पुणे अशा विविध शहरात घेऊन जाते. महाड आगारामध्ये यापूर्वी अनेकवेळा चालक-वाहक आणि इतर कर्मचारी वर्गाची मागणी करूनही दुर्लक्ष केले जात आहे. आता पुरेशा गाड्या असल्या तरी या गाड्या चालवण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने अनेक फेऱ्या रद्द करण्याची वेळ महाड आगारावर आली आहे. महाड एसटी आगारामध्ये ३८ आणि तेवढेच वाहक संख्या रिक्त आहे. महाड एसटी आगारातून ३५७ लोकल आणि लांब पल्ल्याच्या फेऱ्या सुरू आहेत. या ठिकाणी एसटीने घेतलेल्या ४४ खाजगी बसेसच्या फेऱ्या सुरू आहेत. महाड डेपोकडे यापूर्वी गाड्यांचा तुटवडा जाणवत होता. मात्र आता जवळपास दहा नवीन गाड्या एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. परिणामी, वाहकांची संख्या कमी असल्याने महाडमधील प्रवाशांना अन्य आगारातील एसटी बसेसवर अवलंबून राहावे लागत आहे. पान २ वर

### महाड एसटी आगारातील रिक्तपदांची यादी

- चालक, वाहक : ३७ पदे रिक्त
- पाळी प्रमुख : ३ मंजूर पैकी ३ रिक्त
- वाहन परीक्षक : ३ मंजूर पैकी रिक्त ३ रिक्त
- टायर फिटर : २ मंजूर पैकी २ रिक्त
- यांत्रिक : ४९ मंजूर पैकी ११ रिक्त
- सफाई कामगार : ५ मंजूर पैकी ५ रिक्त
- आगार लेखाकार : १ मंजूर पैकी १ रिक्त
- वरिष्ठ लिपिक : ३ पैकी २ रिक्त
- सहा. वाहतूक निरीक्षक: १ मंजूर १ रिक्त
- सहा. कार्यशाळा अधिकारी १ मंजूर १ रिक्त

> **काही दिवसांवर गणेशोत्सव आल्याने महाड आगाराकडे पुरेसा कर्मचारी असणे गरजेचे आहे. प्रवाशांची गैरसोय होणार नाही याचीदेखील काळजी घेतली पाहिजे. थेट गावातून आणि रेल्वे स्थानकावरून गणेशभक्तांना सोडण्याची व्यवस्था झाली पाहिजे**
> **-कमलेश कोर्पे, सामाजिक कार्यकर्ता**

## वेधक

### पावसाचा जोर वाढणार

**मुंबई :** आंध्र प्रदेशमधील किनाऱ्यावर नवीन कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून, यामुळे मोसमी पाऊस पुन्हा सक्रिय होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. दरम्यान, हा कमी दाबाचा पट्टा १५ ऑगस्टपर्यंत त्याच परिसरात स्थिर राहील आणि त्यानंतर पश्चिम उत्तर पश्चिमेकडून छत्तीसगडमार्गे सरकेल.काही दिवसांपासून राज्यात पावसाने ओढ दिली होती. अनेक भागात उन्हाचा तडाखा वाढला होता. काही ठिकाणी तापमान ३५ अंशापुढे नोंदले गेले होते. पावसाळ्यात उकाडा आणि उन्हाचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत होता. आंध्र प्रदेश किनाऱ्यावर निर्माण झालेल्या कमी पान २ वर

### कबुतरखान्यांवरील बंदी कायम

**मुंबई :** मुंबईतील कबुतरखाने बंद ठेवायचे की नाही, या विषयावर महत्त्वाची सुनावणी बुधवारी (दि.१३) मुंबई उच्च न्यायालयात झाली. यावेळी कबुतरखान्यांवरील बंदी तुर्तास कायम ठेवण्याचा मोठा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. या प्रकरणात झालेल्या सुनावणीमध्ये कबुतरांना सकाळी ६ ते ८ या वेळेत काही अटींसह खायला देता येईल का? यावर विचार करता येईल, असे मुंबई महापालिकेने न्यायालयात स्पष्ट केले. त्यावर कबुतरांच्या आरोग्याचा विचार करा, असे न्यायालयाने महापालिकेला सुनावलं. याचिकाकर्त्यांनी यावेळी कबुतकरांना पान २ वर

# बाप्पांच्या मूर्तींना महागाईचा फटका

## कच्च्या मालाचे दर वाढल्याने यंदा मूर्ती महागल्या

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. बाजारात गणेशमूर्तींचे स्टॉल लागले असून, गणेशमूर्ती बनविणाऱ्या कारखान्यात कारागीर मूर्तीवर अखेरचा हात फिरविताना दिसत आहेत. यात महिला कारागिरांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहे. यंदा गणेशोत्सवात किमती वाढल्याने अनेकांकडून छोट्या मूर्तींना पसंती दिली जात आहे.

अनेकांनी आतापासूनच मूर्तीची आगाऊ नोंदणीस सुरवात केली आहे. मूर्तीच्या दरांत वाढ झाल्याने भक्तांवर आर्थिक भार पडणार आहे. भक्तांना आतापासूनच बाप्पांच्या आगमनाचे वेध लागले आहेत. कच्च्या मालाचे भाव वाढल्याने श्रींच्या मूर्तीच्या किमतीत वाढ झाली आहे. कच्च्या मालाचा तुटवडा व कारागिरांची टंचाई अशा दिव्यातून हा व्यवसाय मार्गक्रमण करीत आहे. त्यामुळे महिला कारागीर व्यवसायाकडे वळल्या आहेत.

गणपती बनवण्यासाठी लागणाऱ्या किमती वाढल्याने छोट्या मूर्तींना पसंती आहे. कच्च्या मालात सातत्याने भाववाढ होत असल्याने यंदा श्रींच्या मूर्तीच्या किमतीत वाढ होणार आहे. पान २ वर

# दिवसाढवळ्या चालतो उरणमध्ये 'नशेचा बाजार'

**। उरण । वार्ताहर ।**

उरण चारफाटा, शहर आणि तालुक्यातील पान टपऱ्यांवर दिवसाढवळ्या चरस, गांजा आणि गुटख्याची खुलेआम विक्री सुरू असून, पोलिसांनी डोळेझाक केल्याने जनतेत संतापाची लाट उसळली आहे. तरुण पिढीला नशेच्या गर्तेत ढकलणारा हा धंदा एवढ्या उघडपणे सुरू आहे की, उरण लवकरच मादक पदार्थांचे केंद्रबिंदू ठरण्याच्या मार्गावर आहे. चारफाट्यावर गांजाची विक्री बिनदिक्कत सुरू आहे. तालुक्यातील बहुतेक पान टपऱ्यांवर चरस, गांजा आणि गुटखा विक्रीचा उघड व्यवसाय सुरु आहे. परप्रांतीयांनी भाड्याने पान टपऱ्या घेतल्या आणि नशेच्या पैशातून गाळे, सदनिका, पान २ वर

## पनवेल महानगरपालिकेविरोधात

# महाविकास आघाडीचा पोलखोल मोर्चा

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महानगरपालिकेच्या अन्यायकारक, अवास्तव व जनतेच्या दिशाभूल करणाऱ्या मालमत्ता कर वसुलीविरोधात शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस पक्ष, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना (उबाठा), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, महाविकास आघाडीचे घटक पक्ष, आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी, पनवेल तालुका प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती, सामाजिक संघटना व विविध फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने पोलखोल धडक मोर्चा बुधवारी (दि.१३) काढण्यात आला. या मोर्च्यामुळे प्रशासनाला चांगलाच घाम फुटला होता.



बुधवारी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा येथून या मोर्च्याला सुरुवात करण्यात आली. या मोर्चामध्ये शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते बबनदादा पाटील, माजी आमदार बाळ माने, जिल्हा प्रमुख शिरीष घरत, संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, संजोग वाघेरे पाटील, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, मनसेचे योगेश चिले, शिवसेना उप जिल्हा प्रमुख भरत पाटील, रामदास पाटील, महानगर प्रमुख अवचित राऊत, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, कॅप्टन कलावत, हेमराज म्हात्रे, मा.नगरसेविका शशिकला सिंग, नारायण घरत, राजेश केणी, ॲड. विजय गडगे, प्रकाश म्हात्रे, प्रदीप ठाकूर, महिला आघाडीच्या रेवती सपकाळ, अनिता डांगरकर, अर्चना कुळकर्णी, उज्ज्वला गावडे, श्रुती म्हात्रे, अश्विनी देसाई, महादेव वाघमारे, शहर प्रमुख यतीन देशमुख, सदानंद शिर्के, पान २ वर

> **नवी मुंबई विमानतळाच्या नामांतरासंदर्भात पनवेल महापालिकेने लावलेल्या फलकावर नवी मुंबई विमानतळ लिहिले होते. त्याला आज काळे फासण्यात आले. तसेच केंद्राचा आणि राज्य शासनाचा निषेध करण्यात आला.**

# नेरळमध्ये मध्यरात्री तिरंगा फडकणार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील हुतात्मा स्मारक समितीच्यावतीने भारताचा स्वातंत्र्यदिन मध्यरात्री बारा वाजून एक मिनिटांनी साजरा केला जाणार आहे.

नेरळ येथील हुतात्मा चौकात भारतीय सेना दलातील निवृत्त कर्नल डॉ. कुशाग्र पटेल हे ध्वज फडकविणार आहेत.

नेरळ येथील हुतात्मा स्मारक समितीच्यावतीने भारताचा स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट रोजी पहिल्या प्रहरी बारा वाजून एक मिनिटांनी तिरंगा फडकावून साजरा केला जाणार आहे.

२००५ पासून नेरळ येथील कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील माथेरान नाका येथील हुतात्मा चौकात स्वातंत्र्यदिन मध्यरात्री बारा वाजून एक मिनिटांनी तिरंगा फडकावून आनंद साजरा केला जातो. यावर्षी भारतीय सेना दलातील निवृत्त



कर्नल डॉ.कुशाग्र पटेल यांच्या हस्ते तिरंगा फडकला जाणार आहे. मध्यरात्री होणाऱ्या या कार्यक्रमात नेरळ परिसरातील माध्यमिक शाळांमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. यावर्षी नेरळ येथील एलएईएस शाळेच्या विद्यार्थिनी आर्या मिलिंद सुर्वे ही कर्जत तालुक्यात प्रथम आली. तिचा सत्कार या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते होणार असून याप्रसंगी रात्री अकरा वाजता तिरंगा रॅली आणि मशाल फेरी काढली जाणार आहे. देशप्रेमी या रॅलीमध्ये सहभागी होऊन हुतात्मा चौक ते नेरळ-हुतात्मा चौक अशी दौड काढत असतात. या सोहळ्याला नेरळ गावातील रहिवासी, तरुण आणि विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन हुतात्मा स्मारक समितीने केले आहे.

# महामार्गावर भीषण अपघात

## डॉक्टर तरुणीचा जागीच मृत्यू

**। महाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावर कारने ट्रकला धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात कार कंटेनरखाली अडकल्याने कारचा चुराडा झाला. तर एका ३२ वर्षीय महिला डॉक्टरचा मृत्यू झाला. टेमपाले गावच्या हद्दीत हा अपघात लाणेरे-महाड दरम्यान झाला. अपघातानंतर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.

मिळालेल्या माहितीनूसार, डॉ.प्रियांका आहेर आणि डॉ. विशाल बडे हे मुंबई-गोवा हायवेवरून पान २ वर

## तंत्रज्ञानात भारताचा मोठा विजय! चीनला मागे टाकत ठरली गेमचेंजर

# हायड्रोजन ट्रेनने घडवला इतिहास

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

हायड्रोजनवर चालणारी इंजिने बनवण्यात भारताने चीनला मागे टाकले आहे. देशात शून्य-उत्सर्जन तंत्रज्ञान असलेल्या हायड्रोजन ट्रेनची चाचणी सुरू झाली आहे. भारतीय रेल्वेने जगातील सर्वात जास्त हॉर्सपॉवर असलेले हायड्रोजन इंजिन तयार केल्याचा दावा करण्यात आला आहे.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ट्विट केले की, भारताची पहिली हायड्रोजन ट्रेन लवकरच येत आहे.

सप्टेंबर २०२२ मध्ये हायड्रोजनवर चालणाऱ्या गाड्या सुरू करणारा जर्मनी हा पहिला देश होता. जर्मनी, फ्रान्स, स्वीडन आणि चीननंतर ही हायड्रोजन इंजिन ट्रेन विकसित करणारा भारत हा पहिला देश असेल. त्याची खासियत अशी आहे की, जगातील कोणत्याही देशाने त्याच्या इंजिनच्या तुलनेत इतक्या उच्च अश्वशक्तीचे इंजिन विकसित केलेले नाही. या गाड्यांमध्ये ५०० ते ६०० अश्वशक्तीचे ट्रेन इंजिन आहे.

अश्विनी वैष्णव म्हणाले की, हा उपक्रम जागतिक हरित क्रांतीच्या नकाशावर भारताला दृढपणे स्थापित करेल आणि २०७० पर्यंत निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जन लक्ष्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. जुलैच्या सुरुवातीला, अश्विनी वैष्णव म्हणाले होते की, चेन्नईतील आयसीएफ येथे पहिल्या हायड्रोजन-चालित कोचची यशस्वी चाचणी घेण्यात आली. भारत १२०० एचपी हायड्रोजन ट्रेन विकसित करत आहे. यामुळे भारत हायड्रोजन-चालित ट्रेन तंत्रज्ञानातील आघाडीच्या पान २ वर

### ८० कोटी रुपयांची ट्रेन

**या कार्यक्रमांतर्गत ३५ हायड्रोजन ट्रेन बांधल्या जातील. प्रत्येक ट्रेनची किंमत ८० कोटी रुपये असेल. प्रत्येक मार्गावर हायड्रोजन रिफ्युएलिंग आणि देखभाल सुविधांसाठी ७० कोटी रुपये वाटप केले जातील. हायड्रोजनवर चालणाऱ्या गाड्या केवळ पाण्याची वाफ उत्सर्जित करतात. ज्यामुळे त्या डिझेलवर चालणाऱ्या गाड्यांसाठी पर्यावरणपूरक पर्याय बनतात. हरियाणातील जिंद आणि सोनीपत दरम्यान त्याची दोलन चाचणी घेतली जाईल. या चाचणी दरम्यान, ही ट्रेन प्रवाशांच्या वजनाइतकीच वजनाने चालवली जाईल. प्लास्टिकच्या बॅरलमध्ये धातूची पावडर टाकून प्रत्येकी ५० किलो वजनाचे हे उपकरण तयार करण्यात आले आहे.**



ATTENTION X[th] PASS, XII[th] PASS, GRADUATES & WORKING PROFESSIONALS

Estd. 1999 | Suryadatta Education Foundation's

SURYADATTA® GROUP OF INSTITUTES, PUNE

SURYADATTA Enriching Career and Enhancing Lives Since 1999 | SURYADATTA Enabling Holistic and Sustainable Development Since 1999

TRUSTED NAME FOR QUALITY EDUCATION & HOLISTIC DEVELOPMENT @ AFFORDABLE FEES FOR ASSURED SUCCESS

ARTIFICIAL INTELLIGENCE & CYBER SECURITY MODULES FOR ALL

ADMISSION OPEN



12+ Unique World Record Endorsed by 100+ World Record Agencies | 100+ National & International MOUs | 1 Lakh + Students and Alumni Across the Globe | SURYADATTA Celebrating - 2025 27 years of ACADEMIC EXCELLENCE Enriching Career & Enhancing Lives ! | 220+ National & International Awards | 300+ National & International Patents | 1025+ Recruiters

SURYADATTA OFFERS NEXT GEN SKILL SET, BASED TECH CERTIFICATE MODULES IN AI, CYBER, BLOCKCHAIN, FINTECH, DRONE, AVIATION ETC FROM INDUSTRY PROFESSIONALS & ORGANIZATIONS

Arts
- BA
- MA

8956932402, 8378998127, 8956932400

Commerce
- B.Com
- M.Com
- B.Com - Computer Application
- B.Com - Business Management
- B.Com - International Business

8956932419, 8956932402, 8956932400

Management
- BBA
- BCA
- MBA
- MCA
- PGDM

7262011114, 8956932412, 8956932402

Hotel Management
- B.Sc. Hospitality Studies
- M.Sc. Hospitality Studies
- Diploma in Hotel Management

8956932408, 8956938603, 8956932400

Design & Animation
- B.Sc. Fashion Design
- B.Sc. Interior Design
- B.Sc. Animation
- Diploma in Interior Design

8956932405, 8956932416, 8956932402

Event Management
- Diploma & Advanced Diploma

8956932415, 8378998124, 8956932400

OUR CONSTANT SOURCE OF INSPIRATION



Mrs. Sushama S. Chordiya & Prof. Dr. Sanjay B. Chordiya. Managing Trustee SEF tying Rakhi to H.E. Hon'ble President of India, Smt. Droupadi Murmu ji.

Physiotherapy
- B.P.Th.

7262011338, 7262011774, 8956932400

Pharmacy
- D. Pharm
- B. Pharm

7262011339, 7499915674, 8956932400

Nursing
- ANM

7391000526, 7391000533, 7776072000

Dieticians
- Diploma in Yoga Naturopathy and Dietetics

9112297606, 7391000526, 8956932400

Suryadatta Global Finishing School
Unique Liberal Arts Program for Global Market Place
9763266829

Cyber Security, AI & ML Computer Science,
- B.Sc. Cyber Security
- M.Sc. Cyber Security
- B.Sc. Cyber & Digital Science
- B.Sc. AI & ML
- B.Sc. Data Science
- M.Sc. Data Science
- B.Sc. Computer Science
- M.Sc. Computer Science
- B.Sc. Computer Application
- M.Sc. Computer Application
- B.Sc. Information Technology
- M.Sc. Bioinformatics
- M.Sc. Media & Comm. Studies

8956932419, 8956932402, 8956932400

Law
- B.A.LL.B
- B.B.A.LL.B.
- LL.B.
- LL.M.

Diploma in
- Cyber Laws
- Taxation Laws
- Labour Laws & Labour Welfare
- Intellectual Property Rights Laws
- Certificate Course in Forensic Science & Medical Jurisprudence

9371096506, 8956932411, 8956932400

Ph.D. in Management
- Ph.D. in Management

020-67901300, 8956932400

We are open on all Sundays | Hostel Facilities Available

For details Scan

UNIQUENESS: Prestigious Academic MOUs / Tieups / Membership with National & International Organizations / Universities

Pioneering Education for the Future: Shaping trailblazing professionals through modern, interdisciplinary learning frameworks. | Dynamic Industry-Academia Interface: Bridging the gap between education and enterprise to create industry-ready graduates | Engaging and Experiential Learning: Encouraging immersive, hands-on, & collaborative academic experiences.

Follow us on www.suryadatta.org For Career Guidance : 8956932400 / 9763266829

## निवडक



### अरुणकुमार वैद्य यांची पुण्यतिथी साजरी

**अलिबाग :** भारताचे माजी लष्कर प्रमुख व अलिबागचे सुपुत्र जनरल अरुणकुमार वैद्य यांची ३९वी पुण्यतिथी अ.ता.शि.प्र. मंडळाच्या शिशुविहार प्राथमिक शाळेत साजरी करण्यात आली. यावेळी महावीरचक्रपुरस्कार विजेते अरुणकुमार वैद्य यांच्या आपरेशन ब्लस्टार संबंधी माहिती सभाध्यक्ष बळवंत वालेकर, कॅप्टन उमेश वाणी, ॲड. प्रसाद पाटील, योगेश मगर, सुकुमार भगत, संतोष तावडे व राजेंद्र म्हात्रे यांनी आपल्या भाषणात सांगितली. तसेच, जनरल वैद्य यांचा स्मृतिदिन शासकीय इतमामाने साजरा होण्यासाठी हे प्रकरण जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मंत्रालयात पाठविले गेले असून ते विचाराधीन असल्याचे बळवंत वालेकर यांनी सांगितले. या कार्यक्रमानिमित्त माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक व रघूजीराजे आंग्रे यांच्याकडून आलेल्या शुभ संदेशांचे वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाला द. ल. माळवी, सुकुमार भगत, व्रुषाली ठोसर, ॲड. अजय उपाध्ये, ॲड. प्रमोद पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### महसूल सप्ताह की मलिदा सप्ताह?

**उरण :** राज्यात साजरा होत असलेला महसूल सप्ताह हा जनतेच्या सेवेसाठी नसून, महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या खिशाला मलिदा भरण्यासाठीच असल्याचा आरोप जनतेतून केला जात आहे. रायगड जिल्ह्यातील महसूल विभागाच्या आशीर्वादाने किनारपट्टी भागात बंगले, इमारती, कंटेनर यार्ड, भंगार माफिया, पार्किंग, सर्व्हिस सेंटर, ढाबे, टपऱ्या यांचा अनधिकृत विळखा फोफावला आहे. या सर्व व्यवहारांतून लाखोंचा मलिदा अधिकाऱ्यांच्या खिशात जात असल्याची चर्चा रंगली आहे. वृत्तपत्रांमधून कित्येकदा भांडाफोड झाला, सामाजिक संघटना व पत्रकारांनी वारंवार लेखी पत्रव्यवहार करून कारवाईची मागणी केली, तरी प्रशासन गेंड्याच्या कातडीसारखे निष्क्रिय बसले आहे. उलट काही अधिकारी उघडपणे सांगतात की, आम्हाला कुठेही नोकरी करायची आहे, सोयरसुतक नाही आणि अनधिकृत व्यावसायिकांकडून मलिदा घेत, कारवाईच्या नावाखाली चालढकलपणा करतात. त्यामुळे जनतेचा आरोप आहे की, महसूल विभाग म्हणजे अधिकाऱ्यांसाठी सोन्याची अंडी देणारी कोंबडी असून सरकारने तात्काळ जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांच्या बेहिशेबी मालमत्तेची चौकशी करून भ्रष्टाचार उघड करावा. असे न केल्यास जनतेचा राग रस्त्यावर उतरून महसूल कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन करू, असाही इशारा देण्यात आला आहे.

# धरणांमध्ये 95 टक्के जलसाठा

- धरणांच्या पातळीत कमालीची वाढ
- २४ धरणे शंभर टक्के फुल्ल

| अलिबाग | प्रतिनिधी |

**रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या अडीच महिन्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. या पावसामुळे नदी, नाले, धरणे, विहीरी पाण्याने तुंडूंब भरून गेल्या आहेत. मे महिन्याअखेर पाण्याविना कोरडी पडलेली धरणेदेखील पाण्याने भरली आहेत. जिल्ह्यातील मुरूड, तळा, रोहा, पेण, अलिबाग, सुधागड, श्रीवर्धन, म्हसळा, महाड, कर्जत, खालापूर, पनवेल व उरण या तेरा तालुक्यांमधील २८ धरणांमध्ये ९५ टक्के जलसाठा आहे. यंदाच्या मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील धरणांच्या पातळीत कमालीची वाढ झाली असल्याची माहिती येथील लघू पाटबंधारे विभागाकडून देण्यात आली आहे.**



**गतवर्षीच्या तुलनेने पाण्यात घट**

गतवर्षी जिल्ह्यातील धरणांमध्ये ९६ टक्के इतका जलसाठा होता. यावर्षी ९५.२५ टक्के इतका जलसाठा आहे. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेने यावर्षी १.२५ टक्केने घट झाल्याची माहिती समोर येत आहे. गेल्यावर्षी जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला होता. परंतु, यंदा जुलै महिन्यात पाऊस कमी पडला असल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले आहे.

जिल्ह्यातील बहुतांश धरणांनी मे महिन्यामध्ये तळ गाठला होता. त्यामुळे परिसरातील गावांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागत होती. अखेर मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात अवकाळी पाऊस पडला. या पावसामुळे कोरडी पडलेली धरणे, नदी व विहीरींमध्ये काही प्रमाणात पाणी साचले. त्यानंतर काही दिवस पावसाने विश्रांती घेतली आणि पुन्हा जून महिन्याच्या दूसऱ्या आठवड्यात पाऊस सुरु झाला. जूलै महिन्यात ही काही प्रमाणात विश्रांती घेतली होती. परंतु, पावसाने पुन्हा जोरदार सुरूवात केली. त्यामुळे नदी, तलावासह विहीरीदेखील पाण्याने भरल्या आहेत. जिल्ह्यातील नागरिकांसह कारखान्यांना पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये जलसाठा वाढला आहे. धरणांतील पाण्याची पातळी वाढल्याने पाण्याचा पुरवठा ही मुबलक प्रमाणात होऊ लागला आहे.

लघु पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित १३ तालुक्यांमध्ये २८ धरणे आहेत. या धरणांद्वारे ग्रामीण व शहरी भागात पाणी पुरवठा केला जातो. या धरणांमध्ये सध्या ९५.२५ टक्के जलसाठा आहे. सुतारवाडी, पाभरे, संदेरी, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, वरंध, कोंडगांव, उन्हेरे, कवेळे, भिलवले, वावा, फणसाड, घोटवडे, कलोते-मोकाशी, डोणवत, आंबेघर, उसरण, मोरबे, अवसरे, बामणोली, ढोकशेत, कुडकी, साळोख या २४ धरणांमध्ये शंभर टक्के जलसाठा आहे. श्रीवर्धनमधील कार्ले धरणात ९९ टक्के पाणी आहे. अलिबागमधील श्रीगाव, उरणमधील पुनाडे आणि श्रीवर्धनमधील रानीवली धरणामध्ये ७५ टक्के जलसाठा असल्याची माहिती लघु पाटबंधारे विभागाने दिली आहे.

## शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे उपोषण स्थगित



| उरण | प्रतिनिधी |

जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी द्वारे चालवल्या जाणाऱ्या आरकेएफ विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी ११ ऑगस्ट पासून उपोषण सुरू केले होते. मात्र, जेएनपीएचे चेअरमन उन्मेश वाघ यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे मंगळवारी (दि.१२) हे उपोषण स्थगित करण्यात आले आहे. यावर तातडीने लक्ष देत जेएनपीएचे चेअरमन उन्मेश वाघ यांनी मंगळवारी तातडीची बैठक बोलावली. या बैठकीत त्यांनी कर्मचाऱ्यांचे प्रश्न येत्या पंधरा दिवसांमध्ये सोडवण्याची हमी दिली. या आश्वासनानंतर कर्मचाऱ्यांनी आपले उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, ३१ ऑगस्टपर्यंत त्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास स्थगित केलेले आंदोलन पुन्हा सुरू करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीत चेअरमन उन्मेश वाघ, उपाध्यक्ष अनिरुद्ध जोशी, व्यवस्थापक विनय मल्ह, आणि सचिव म्हणून मनीषा जाधव यांच्यासह माजी आमदार मनोहर भोईर, भूषण पाटील, शालेय मुख्याध्यापक आणि शिक्षक उपस्थित होते.

## प्रीपेड मीटरला रोहेकरांचा विरोध

### वीज ग्राहकांसाठी शेकापच्यावतीने निवेदन

| कोलाड | प्रतिनिधी |

महावितरण कंपनीने रोहा तालुक्यातील वीज ग्राहकांना न विचारता जुने मीटर बदलून स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्याचा उच्छांक मांडला आहे. तर, मिटर लावण्यास घरेलु वीज ग्राहकांचा प्रचंड विरोध आहे. जनतेचा विरोध लक्षात घेऊन रोहा तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने बुधवारी (दि.१३) रोहा येथील रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक सभागृहत स्मार्ट प्रीपेड मीटर विरोधी सभा आयोजीत करण्यात आली होती.

स्मार्ट प्रीपेड मीटर हा केंद्र सरकारचा प्रकल्प असून तो महाराष्ट्रात राबवल्या जात आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून तालुक्यातील गावागावात ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्यात येत असून याला वेळीच विरोध करण्याची भूमिका सर्व साधारण सभेत घेण्यात आली. तर, स्मार्ट ग्राहकांना सक्ती




करू नये. हे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले असून देखील ती पुन्हा ग्राहकावर सक्ती करत घरगुती मीटर बसविले जात आहेत. याला रोहा शेकापने कडाडून विरोध करत वीज ग्राहकांच्या घरात स्मार्ट प्रीपेड मीटर बसू देणार नाही. बसविण्याचा प्रयत्न केलात तर उग्र आंदोलन करू, असे शंकरराव म्हसकर यांनी सांगितले. लगेच या शिष्ठ मंडळाने नेते शंकरराव म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका चिटणीस शिवराम महाबळे यांच्या अध्यक्षतेखाली रोहा कार्यकारी अभियंता प्रदीप दाळू यांना वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर न बसविण्याचे निवेदन दिले

यावेळी शेकापचे राज्य कार्यकारणी सदस्य शंकरराव म्हसकर, तालुका चिटणीस शिवराम महाबळे, मजूर फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष हेमंत ठाकूर, मारुती खांडेकर, तुकाराम खांडेकर, पुरोगामी तालुका युवक अध्यक्ष संतोष दिवकर, संदेश विचारे, दीपक डाईटकर, लक्ष्मण चव्हाण, विनायक धामणे, सोहिल अधिकारी, अरविंद भिलारे आदी उपस्थित होते.

## सुशिक्षित तरुण बेरोजगारीच्या भट्टीत

| उरण | प्रतिनिधी |

उरण-पनवेल परिसरातील सुशिक्षित प्रकल्पग्रस्त तरुणांची बेरोजगारी दिवसेंदिवस विक्राळ रूप घेत आहे. खासगीकरणाच्या नावाखाली कामगार कपात, प्रकल्पांमधून स्थानिकांचा पत्ता पुसून परप्रांतीयांची मोठ्या प्रमाणावर भरती सुरू आहे. पदवी-डिग्री घेऊनही स्थानिक तरुणांना नोकरीची दारे बंद आहेत. पूर्वी जेएनपीटी व अन्य प्रकल्पांत स्थानिकांची भक्कम उपस्थिती होती, ती आज हाताच्या बोटावर मोजण्याइतकी उरली. कायद्याने प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याचा अधिकार असतानाही तो कागदावरच राहिला आहे. बेरोजगारीचा ज्वालामुखी फुटण्यापूर्वी सत्ताधाऱ्यांनी जागे व्हावे, अशी चर्चा येथील जनतेत सुरू आहे.



# भरतशेटचा शापित कोट

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तेव्हा आपण नक्की मंत्री होणार असे भरतशेठना वाटत होते. म्हणून त्यांनी कोटदेखील शिवून घेतला. पण तो शिवताना बहुदा मुहूर्त पाहिला नाही किंवा त्याला बहुदा शिंदे गटातल्या बाकी इच्छुकांचीच दृष्ट लागली. तेव्हा ते मंत्री झाले नाहीत. आता फडणवीसांनी मंत्री केले. पण हवे ते खाते दिले नाही. आता पालकमंत्रिपदाचे भिजत घोंगडे तसेच पडून असताना साधे १५ ऑगस्टचे झेंडावंदनदेखील त्या कोटाच्या नशिबी नाही. वास्तविक देवीचा जप केला नसेल तेवढा त्यांनी पालकमंत्रिपदाचा जप केला आहे. पण ती देवी आणि ते पालकमंत्रिपद त्यांना काही प्रसन्न होत नाही. पण खरे सांगायचे तर गोगावले यांच्या कोटालाच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्रालाच सध्या दृष्ट लागलेली आहे. फडणवीस सरकारची रिक्षा चालायला लागून आता नऊ महिने होत आले, पण नव्याचे नऊ दिवस म्हणतात तितकीही ही धड चाललेली नाही. आता तर या रिक्षाचे तीन चालक तीन दिशांना ती खेचून घेऊन चालले आहेत. लाडकी बहीणच्या नावाने फसवाफसवी करून, ४० लाख नवीन मतदारांची नावे एकाएकी यादीत टाकून आणि इतरही बरेच प्रताप करून महायुतीचे सरकार सत्तेत आले. पण इतकी पापे करून सत्तेत आलेल्यांना तिचे सुख लाभावे तरी कसे? वरवर दाखवण्यापुरते सर्व काही ठीक चालू असले तरी सरकारात आत प्रचंड खळबळ आहे. मुळात लाडकी बहीण योजनेमुळे सरकारकडे पैसेच शिल्लक नाहीत. त्यामुळे गेल्या नऊ महिन्यात आमदारांना मिळणाऱ्या निधीचा एक पैसाही त्यांना मिळू शकलेला नाही. संजय गायकवाड या शिंदे गटाच्या आमदारांनी याबाबत उघड तक्रार केली आहे. यावर अजित पवार यांनी घाईघाईने खुलासा केला की, जिल्हा नियोजन मंडळांसाठीचे बावीस हजार कोटी रुपये त्यांना वर्ग झालेले आहेत. पण हा सर्व कागदी घोडे नाचवण्याचा प्रकार आहे. हे वर्ग करा असे आदेश झालेही असतील. पण जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये प्रत्यक्षात पैसे आलेले नाहीत.

## शिंद्यांचे पंख छाटले

आता कृषीमंत्री झालेले दत्ता भरणे यांनीच निधी आलेला नसल्याची तक्रार मध्यंतरी केली होती. त्यावर आपण त्यांच्याशी थेटच बोलू अशी दमात घेणारी भाषा त्यांचे नेते अजितदादांनी वापरली होती. भरणे हे दादांचे लाडके मानले जातात. त्यांची ही स्थिती असेल तर बाकीच्या दोडक्यांचे काय झाले असेल याची कल्पनाच केलेली बरी. आमदारनिधीतून बऱ्याचदा रस्त्यांची कामे केली जातात. पावसाळ्यात त्यांची गरज असते. पण पाच कोटीपैकी गेल्या नऊ महिन्यात एकही रुपया मिळालेला नसेल तर राज्य दिवाळखोरीकडे चालल्याचे ते लक्षण आहे. जिल्हा नियोजन समित्यांमध्ये निधीचे वाटप पालकमंत्र्याच्या दबावानुसार होते हे उघड गुपित आहे. शिवाय राज्य स्तरावर विकास प्रकल्प जाहीर करताना विरोधकांना सरळ सरळ डावलण्याचे धोरण अजितदादांनी सुरू केले आहे. त्यामुळे आमदार निधी न मिळाल्याच्या उघड तक्रारी करायला फार कोणी धजावत नाही. पण त्यामुळे वस्तुस्थिती लपत नाही. मुद्दा असा की, राज्याच्या हलाखीच्या स्थितीत पैसे व कामे अगदीच तुटपुंजी असणार आहेत. त्यावर हात मारण्यासाठी सत्तेतल्या तीन ड्रायव्हरांची स्पर्धा चालू आहे. रायगडच्या पालकमंत्रिपदाचा वाद हा त्याचाच निदर्शक आहे. त्याला फडणवीस विरुध्द एकनाथ शिंदे या सत्तास्पर्धेची किनारही आहे. आपण भयंकर लोकप्रिय असून राज्यातली सत्ता आपल्यामुळेच आल्याचा पक्का भ्रम शिंदे यांना झाला आहे. त्यामुळे शिंदे यांचे लाड आता पुरे झाले असे भाजपने ठरवल्याचे स्पष्टपणे दिसते. शक्य असेल तिथे शिंदे यांचे पंख कापण्याचे धोरण फडणवीसांनी अवलंबले आहे. त्यांना पक्षाचा पूर्ण पाठिंबा आहे. शिंदे यांचे आमदार असलेले संजय शिरसाट यांना प्राप्तिकर खात्याच्या नोटिसा येणे व त्यांचे पैशांच्या बॅगांसोबतचे व्हिडिओ प्रसिध्द होणे हे अजिबात योगायोग नव्हते. अलिकडेच शिंदे गटाचे संदिपान भुमरे यांच्या मुलाच्या ड्रायव्हरकडे कोट्यवधी रुपयांचा भूखंड असल्याचे प्रकरण बाहेर आले. शिंदे यांच्या नगरविकास खात्याच्या प्रकल्पांना आता प्रत्यक्ष फडणवीस यांची मंजुरी असल्याखेरीज ते संमत होणार नाहीत असा आदेश जुलैमध्ये काढण्यात आला आहे.

### पदर पसरते, नोकरी वाचवा

मध्यंतरी मीरा-भाईंदर महापालिकेत कचऱ्याच्या बादल्या वितरीत करण्यासाठी १९ कोटींचे कंत्राट देण्याचा प्रस्ताव होता. देवेंद्रांकडे तक्रारी गेल्यावर त्यांनी तो थांबवला असे म्हणतात. त्यामुळे नगरविकास खात्यातल्या मनमानीला आता चांगलाच चाप लागला आहे. याचमुळे शिंदे यांची धुसफूस चालू असून ते सारखे दिल्लीच्या वाऱ्या करत आहेत. पूर्वीच्या काळात आपली नोकरी वाचवण्यासाठी साहेबाला घरी जेवायला बोलावले जाई. किंवा, दुसरा मार्ग म्हणजे आपल्या पत्नीला साहेबाकडे घेऊन जाऊन ती नवऱ्यासाठी पदर पसरत असे. शिंदे आपल्या बायकोमुलां व सुना इत्यादींना घेऊन अलिकडच्या काळात पंतप्रधानांना दोनदा भेटले. एकीकडे ट्रम्प रोज धमक्या देत असताना मोदींनाही असल्या कुटुंबांना भेटण्यासाठी वेळ मिळतो हेही लक्षात घेण्यासारखे आहे. अमित शाह यांनाही शिंदे वेळीअवेळी भेटत असतात. पण मोदी व शाह यांनी भेटी देऊन शिंदे यांना चुचकारल्यासारखे करायचे, पण फडणवीसांना आपली कारवाई करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य द्यायचे अशी रणनीती भाजपने आखलेली दिसते. थोडक्यात भरतशेटच्या त्या शापित कोटाने शिंद्यांच्या नशिबालाही आता पकडलेले दिसते. पण यातला गमतीचा भाग सोडला तर ते होणारच होते. कारण भाजपने रसद पुरवली म्हणूनच शिंदे बंड करू शकले व पुढे मुख्यमंत्री होऊ शकले. त्यांनी दोरी ओढली की शिंद्यांचा वर गेलेला झेंडा खाली येणार हे अगदी स्पष्ट होते. शिंदे आणि त्यांच्या गटातल्या बाकीच्यांना हे कळते आहे, पण वळत नाही अशी अवस्था आहे. गेल्या आठवड्यात मुंबईतील बेस्टचे महाव्यवस्थापक निवृत्त झाले. त्यासरशी शिंदे यांनी नगरविकास खात्याचा अधिकार दाखवून अश्विनी जोशी यांची नियुक्ती केली. पण अवघ्या काही तासात ती रद्द ठरवून मुख्यमंत्र्यांनी दुसऱ्या अधिकाऱ्याला नेमले. फडणवीस यांनी शिंद्यांची सर्व बाजूंनी नाकेबंदी करत आणली आहे याचा हा नमुना आहे. याचमुळे शिंदे आता मंत्रिमंडळ बैठकीला दांड्या मारू लागले आहेत. यात अजितदादांचा गट यात न बोलून शहाणा आहे. धनंजय मुंडे प्रकरण ज्या रीतीने तापवण्यात आले व त्याच वेळी परभणीचे सोमनाथ सूर्यवंशीचे प्रकरण ज्या रीतीने दाबण्यात आले ते पाहून भाजपच्या ताकदीचा दादांना आता अंदाज आला असेल. नाशिकमधल्या कथित हनी ट्रॅप प्रकरणात गिरीश महाजन यांचे नाव जोडले जाताच लगेच खडसे यांच्या जावयाचे प्रकरण बाहेर येते हा योगायोग नसतो हे कळण्याइतके दादा नक्कीच शहाणे आहेत. पण तीन दिशांना तीन चाके अशा स्थितीत ही रिक्षा किती काळ चालणार हा खरा प्रश्न आहे.

**विचार**

# क्रीडाक्षेत्रातील क्रांतीची पहाट

***मंत्रिमंडळाने अलिकडेच राष्ट्रीय क्रीडा धोरणाला मान्यता दिली. २०३६ च्या खेळांसाठी भारतीय क्रीडा परिसंस्था तयार करणे हा त्यामागील उद्देश आहे. हा केवळ धोरणात्मक नाही तर आमूलाग्र बदल आहे. यामुळे भारताच्या क्रीडा परंपरेला जागतिक स्तरावर नेण्याचे, प्रत्येक भारतीयाला खेळाशी जोडण्याचे आणि खेळाला खऱ्या अर्थाने एक लोकचळवळ बनवण्याचे दूरदृष्टीचे पाऊल उचलले जात आहे.***



**प्रा.एस.आर. बखळे**

ज्या दिवशी भारतीय शिष्टमंडळाने २०३६ च्या ऑलिंपिकसाठी तयारी करण्यासाठी लॉसने येथे आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती (आयओसी) च्या अधिकाऱ्यांची भेट घेतली, त्याच दिवशी मंत्रिमंडळाने राष्ट्रीय क्रीडा धोरणाला मान्यता दिली. त्याचा उद्देश २०३६ च्या खेळांसाठी भारतीय क्रीडा परिसंस्था तयार करणे हा आहे. हे धोरण प्रमुख क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून भारताला क्रीडा पर्यटन स्थळ बनवण्यावर लक्ष केंद्रित करते. देशाच्या क्रीडा परिदृश्याला आकार देण्यासाठी आणि क्रीडा माध्यमातून भारतीयांना सक्षम करण्यासाठी हा एक ऐतिहासिक उपक्रम आहे. नवीन क्रीडा धोरण सध्याचे राष्ट्रीय क्रीडा धोरण, २००१ ची जागा घेईल. हे धोरण भारताला जागतिक क्रीडा महासत्ता म्हणून स्थापित करण्यासाठी आणि २०३६ च्या ऑलिंपिक खेळांसह आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धांमध्ये मजबूत दावेदार म्हणून स्थापित करण्यासाठी एक धोरणात्मक रोडमॅपच आहे. खेळाडूंना प्रशिक्षण आणि समर्थन देण्यासाठी जागतिक दर्जाची प्रणाली तयार करणे, राष्ट्रीय क्रीडा महासंघांची क्षमता आणि व्यवस्थापन वाढवणे, क्रीडा कामगिरी वाढवण्यासाठी क्रीडा विज्ञान, औषध आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे, प्रशिक्षक, तांत्रिक अधिकारी आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसह क्रीडा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे आणि विकसित करणे आदी उपक्रमांचा या धोरणात समावेश आहे. हे धोरण क्रीडा क्षेत्रातील आर्थिक क्षमतेवर भर देते आणि त्याचे उद्दिष्ट क्रीडा पर्यटनाला चालना देणे आणि भारतात प्रमुख आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे हे आहे.

सार्वजनिक-खासगी भागीदारी, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी आणि नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा उपक्रमांद्वारे खासगी क्षेत्राच्या सहभागाला या धोरणात प्रोत्साहन देण्यात आले आहे. नवीन क्रीडा धोरण सामाजिक समावेशाला चालना देण्यासाठी खेळांच्या भूमिकेवर भर देणारे आहे. त्याचप्रमाणे विविध क्रीडा कार्यक्रमांद्वारे महिला, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, आदिवासी समुदाय आणि दिव्यांग व्यक्तींचा सहभाग वाढवण्यावर विशेष भर देणारे आहे. स्थानिक आणि पारंपारिक खेळांचे पुनरुज्जीवन आणि त्याला प्रोत्साहन देण्यावर या धोरणात भर आहे. खेळांना एक व्यवहार्य करिअर पर्याय म्हणून स्थापित करण्याबरोबच भारतीय समुदायाला क्रीडाविश्वात सामावून घेण्याचा उद्देश आहे. खेळाला राष्ट्रीय चळवळ बनवणे हे या क्रीडा धोरणाचे आणखी एक उद्दिष्ट आहे. देशव्यापी मोहिमा आणि समुदायआधारित कार्यक्रमांद्वारे खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग आणि फिटनेसबाबत जनजागृती करणे, शाळा, महाविद्यालये आणि कामाच्या ठिकाणी फिटनेसबबात निर्देशांक सादर करणे, क्रीडा सुविधांची सार्वत्रिक उपलब्धता वाढवण्यावर मेहनत घेणेही त्यात अपेक्षित आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने नव्या धोरणात काही प्रस्ताव ठेवण्यात आले आहेत. शालेय अभ्यासक्रमात खेळांचा समावेश करणे. क्रीडा शिक्षण आणि जागरूकता वाढवण्यासाठी शिक्षक आणि शारीरिक शिक्षण शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देणे, यावर भर देण्यात आला आहे. नव्या क्रीडा धोरणातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कायदेशीर चौकटीसह क्रीडा प्रशासनासाठी एक मजबूत नियामक चौकट स्थापित करण्यात येणार आहे. खासगी क्षेत्र निधी आणि समर्थन (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) अशा नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा यंत्रणा विकसित करून 'पीपीपी' आणि 'सीएसआर'द्वारे खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्यात येणार आहे. कामगिरीचा मागोवा घेण्यासाठी, संशोधन करण्यासाठी आणि कार्यक्रम अंमलबजावणीसाठी 'एआय' आणि डेटा विश्लेषणासह अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर अधिक भर देण्यात येणार आहे. एनएसपी २०२५ मध्ये राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी एक मॉडेल म्हणून काम करणार आहे. ऑलिम्पिकमध्ये भारतीय क्रीडापटूंची कामगिरी हळहळू सुधारत आहे. क्रीडा जगतातील या सगळ्यात मोठ्या स्पोर्टिंग इव्हेंटमध्ये भारतीय क्रीडापटू पदक जिंकण्यात यशस्वी ठरू लागले आहेत. मूलभूत सोयी-सुविधांची कमतरता असूनही केवळ गुणवत्तेच्या जोरावर भारतीय क्रीडापटूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची मान अभिमानाने उंचावली आहे. आता भारताच्या नव्या क्रीडा धोरणाची जोड क्रीडापटूंना मिळणार आहे.

या धोरणामध्ये तळागाळातील क्रीडापटूंना पायाभूत सोयीसुविधा पुरवण्यावर भर देण्यात येईल. त्याचप्रमाणे क्रीडापटूंना आर्थिक पाठबळ देण्याचा मानसही आहे. क्रीडाक्षेत्रात मागील काही वर्षांमध्ये भारताने देदीप्यमान कामगिरी केली आहे. प्रतिकूल परिस्थितीत खेळाडूंनी धडे गिरवले आणि भारताचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजवले. भारताने क्रिकेटशिवाय इतर खेळांमध्येही आंतरराष्ट्रीय पातळीवर झेंडा रोवला आहे. असे असताना भारताला क्रीडाक्षेत्रात आणखी भक्कमपणे पाय रोवण्यासाठी केंद्र सरकारने पाऊल उचलले आहे. नव्या क्रीडा धोरणात तळागाळातील क्रीडा स्पर्धांना भक्कम अधार देण्याचे उद्दिष्ट आहे. या माध्यमातून खेळाडूंची पारख केली जाणार आहे. तसेच त्यांना भविष्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. नव्या क्रीडा धोरणानुसार, ग्रामीण आणि शहरी भागात क्रीडा पायाभूत सुविधा अजून अत्याधुनिक करण्याचा मानस आहे. यामुळे खेळाडूंना स्थानिक पातळीवरच आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे. नवीन क्रीडा धोरणांतर्गत खेळाडूंची कामगिरी सुधारण्यासाठी क्रीडा विज्ञान आणि औषधांवर विशेष भर दिला जाईल. प्रशिक्षक, तांत्रिक अधिकारी आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांनाही चांगले शिक्षण दिले जाणार आहे.

नवीन क्रीडा धोरणानुसार भारतात आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यावर भर दिला जाणार आहे. या स्पर्धांमुळे भारतीय खेळाडूंचे मनोबल वाढेल. तसेच भारतीयांमध्ये खेळाप्रती रूची आणि आदर वाढेल. शाळांमध्येही खेळांचे महत्त्व आणखी वाढवले जाणार आहे. मुलांना शालेय जीवनापासूनच आंतरराष्ट्रीय पातळीवर करिअर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात क्रीडा सुविधा पुरवल्या जातील. खेळांना राष्ट्रीय चळवळ बनवण्याचा मुख्य उद्देश या धोरणामागे आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सक्षम पायाभूत सुविधा खेळाडूंच्या यशासाठी आवश्यक असतात. 'खेलो भारत नीती २०२५'अंतर्गत खेळाडूंची निवड आणि प्रगतीसाठी अत्याधुनिक डेटा विश्लेषण आणि क्रीडा विज्ञानाचा वापर केला जाईल. देशभरातून प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेण्यासाठी 'प्रतिभा ओळख कार्यक्रम' राबवला जाईल. त्यामुळे दुखापतींचे व्यवस्थापन, खेळाडूंचे मानसिक आरोग्य सांभाळणे आणि त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ शक्य होईल. क्रीडा पायाभूत सुविधांचा विकास मोठ्या शहरांपुरता मर्यादित राहणार नाही. तळागाळापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत सर्वसमावेशक आणि सुलभ क्रीडा पायाभूत सुविधा विकसित करण्याचे ध्येय आहे. त्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे जागतिक दर्जाची प्रशिक्षण केंद्रे व क्रीडांगणे उभारली जातील. त्यामुळे स्थानिक प्रतिभेला वाव मिळेल.

दिव्यांग खेळाडूंच्या गरजा पूर्ण करण्यासाठी 'पॅरा स्पोर्टस'ला विशेष साहाय्य दिले जाणार आहे. प्रशिक्षक, स्पोर्टस स्टाफ आणि क्रीडा प्रशासकांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देऊन 'सक्षम गुरू, सक्षम खेळाडू' हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात आणले जाईल. 'खेलो भारत नीती'नुसार खेळ आता केवळ आरोग्य आणि मनोरंजनापुरते मर्यादित नसून आर्थिक विकासाचे एक मोठे इंजिन बनले आहेत. 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' अभियानाशी सुसंगत क्रीडा उपकरणांचे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी स्टार्ट अप्स आणि उद्योजकांना प्रोत्साहन दिले जाईल. त्यामुळे नवीन रोजगारसंधींची निर्मिती होईल. यासाठी 'स्पोर्टस बिझनेस ॲडव्हायझरी ग्रुप' ची स्थापना करण्यात येईल. कॉर्पोरेट कंपन्यांना खेळाच्या विकासासाठी गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन देऊन खासगी निधीचा वापर खेळाच्या पायाभूत सुविधा आणि खेळाडूंच्या कल्याणासाठी केला जाईल. विविध खेळांसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा आणि लीगचे नियमित आयोजन खेळाडूंना अधिक संधी देण्यात येईल. भारताचा सांस्कृतिक वारसा आणि क्रीडा कौशल्ये जागतिक स्तरावर नेणे हे या धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. याखेरीज शाळेच्या अभ्यासक्रमात एक प्रमुख विषय म्हणून खेळ समाविष्ट केले जातील आणि लहानपणापासून क्रीडा साक्षरता रुजवण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. या सर्व प्रयत्नांमधून देश क्रीडाक्षेत्रातील उज्ज्वल भवितव्याला गवसणी घालणार आहे.

**(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)**

**चर्चा आजची**

# शिंदे गटाच्या सराव शिबीर स्पर्धेवर 'गोविंदा' नाराज

**संतोष राऊळ**

राज्यातील मानाचा व प्रतिष्ठेचा मानला जाणारा दंहीहंडी सोहळा येत्या १६ ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे. त्या दिवशी प्रत्येक गावागावात छोटी-मोठी गोविंदा पथके मानवी थर लावून वर टांगलेली हंडी फोडतात. आता तो सण केवळ सणापूरता मर्यादित न राहता त्याला खेळाचे महत्व प्राप्त झाले आहे. या दिवशी मोठमोठी मंडळे विशेष करून राजकीय प्रतिनिधी दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करत असतात. त्यात लाखोंची बक्षिसे लावली जातात. त्यामुळे या सणाची चर्चा आता संपुर्ण देशभर होत आहे. गोंविदा पथके दोन ते तीन महिने आधी सरावाला सुरूवात करतात. तेव्हा कुठे ते ५ ते ९ थरांपर्यंतचे मानवी मनोरे उभे करू शकतात. परंतु, हल्ली गोविंदा सरावांना देखील राजकारणी व्यक्तींकडून स्पर्धेचे स्वरूप देण्यात आले असून त्यांना देखील लाखो रूपयांची बक्षिसे लावली जात आहेत. त्यात देखील प्रचंड राजकारण केले जात आहे. त्यामुळे दहीहंडी सणाला गालबोट तर लागणार नाही ना, अशी चर्चा सर्वसामान्यांमधून होत आहे. तसेच, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक पुरस्कृत दहीहंडी स्पर्धेत कोणत्याही प्रकारचे राजकारण न होता सर्व पथकांना समान वागणुक दिली जाते. त्यामुळे इतर आयोजकांनी स्पर्धा कशी घ्यावी हे त्यांच्याकडून शिकावे, असे देखील सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे.

सध्या प्रो गोविंदाचे वारे राज्यात घुमत आहेत. शिंदे गटाचे नेते प्रताप सरनाईक यांच्यातर्फे दरवर्षी प्रो गोविंदा स्पर्धा खेळवली जाते. या प्रो गोविदांमुळेच राज्यभरात त्यांच्याच गटाकडून स्पर्धा खेळवली जात आहे. परंतु, त्यात देखील राजकारण करत असल्याची चर्चा जोर धरत आहे. काही गोविंदा पथकांनी तर थेट आरोपही केले आहेत. दरम्यान, सरनाईक यांच्या प्रो गोविंदा स्पर्धेत नावाजलेल्या जय जवान गोविंदा पथकाला प्रवेश नाकरण्यात आला. त्यामुळे त्यांच्याकडून प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात आली. आयोजकांनी राजकारण करून आम्हाला बाहेर काढल्याचा आरोपही जय जवान गोविंदा पथकाने केला आहे. कारण त्यांनी मुंबईत झालेल्या ठाकरेंच्या विजयी मेळाव्यात थर लावून सलामी दिली होती. त्यामुळेच जय जवान गोविंदा पथकाला ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्यात थर लावून सलामी देणे नडल्याची चर्चा सर्वसामान्यातून होत आहे. यावर प्रो गोविंदाच्या आयोजकांकडून सांगण्यात आले की, प्रो गोविंदा हंगाम ३ च्या नोंदणी प्रक्रियेत राज्यभरातून एकूण १२७ गोविंदा पथकांनी सहभाग नोंदवला. खेळाच्या नियमानुसार जे सर्वात पहिले ३२ संघ नोंदणी करतील त्यांना या स्पर्धेत स्थान दिले जाईल, असे स्पष्ट केले होते. तरी देखील राजकारण करून आयोजकांनी आम्हाला बाद केले अशी बदनामी जय जवान गोविंदा पथक करत आहे. या त्यांच्या आरोपात काहीच तथ्य नाही. निवड प्रक्रिया ही केवळ नियमांनुसार केली जाते, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. परंतु, गेल्या हंगामात ज्यांनी जेतेपद पटकावले त्यांना अशाप्रकारे डावलणे म्हणजे राजकारणींकडून केलेली थट्टाच म्हणावी. जय जवान गोविंदा पथकाचे चाहते संपुर्ण राज्यभर आहेत. त्यांच्याकडून देखील सरनाईक यांच्या प्रो गोविंदावर प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात आली.

तसेच, अलिबाग तालुक्यात देखील शिंदे गटाच्यावतीने दहिहंडी सराव शिबीर स्पर्धा आयेजित करण्यात आल्या होत्या. परंतु, त्यातही राजकारण झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या राजकारणाचा अलिबागमधील मेटपाडा मरीआई गोविंदा पथक बळी पडला होता. शिंदे गटातर्फे रेवदंडा येथे दहिहंडी सराव शिबीर स्पर्धा ठेवण्यात आली होती. त्यात मेटपाडा गोविंदा पथकाने सहभाग घेतला होता. हे पथक कमी वेळेत थर उभारणारे पथक म्हणून ओळखले जाते. वेगवेगळ्या जिल्ह्यात या पथकाचा सहभाग असतो.

परंतु, रेवदंड्यातील पारंपारिक दहीहंडी सराव स्पर्धेत त्यांच्या विरोधात राजकारण झाल्याचा आरोप पथकाकडून केला जात आहे. या स्पर्धेत कमीत कमी वेळेत थर लावतील त्यांना १ ते ५ क्रमांक दिले जातात. हा नियम सर्व गोविंदा पथकांसमोर जाहिर करण्यात आला होता. तरी देखील आयत्यावेळी चिठ्ठी पद्धतीने मेटपाडा पथकाला डावळण्यात आले. त्यामुळे नियमांची पायमल्ली करून आयोजक शिंदे गटाकडून हीनतेची वागणूक देण्यात आल्याचे बोलले जात आहे. शिंदे गटाकडून या स्पर्धेत राजकारण केल्याने त्यांच्या या कृत्याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, अलिबागमध्ये होणाऱ्या माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक पुरस्कृत दंहीहंडी स्पर्धेची चर्चा होत आहे. या स्पर्धेत आयोजन, नियोजन हे पुर्णतः शिस्तबध्द असते. या स्पर्धेत कोणताही पक्षपातीपणा केला जात नाही. येथे सर्वांना सारखेच नियम असतात. म्हणूनच या हंडीला मानाची हंडी बोलले जाते. त्यामुळे इतर आयोजकांनी प्रशांत नाईक यांच्याकडून शिकावे, असे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे.

**लोकसंसद**

## भटक्या कुत्र्याची समस्या देशभर

हल्ली प्रत्येक शहरात भटक्या कुत्र्याची समस्या मोठ्या प्रमाणात आहे, एकट्या पुणे शहरात प्रतिदिन सुमारे ८० नागरिकांना श्वानदंश होतो शहरात भटक्या कुत्र्याची संख्या १ लाख ८० हजार आहे मुंबई मध्ये भटक्या कुत्र्याची संख्या ९० हजाराच्या आसपास आहे, आठ महिन्यात श्वान दंशाच्या सुमारे दहा हजार तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, कल्याण डोंबवली महानगर क्षेत्रांत भटक्या कुत्र्याची संख्या ८० हजार एवढी आहे, २०२३ च्या आकडेवारी नुसार देशभर सुमारे ६.२ कोटी एवढी मोठी आहे, दिल्ली शहरात तर भटक्या कुत्र्यांचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. दिल्ली एन सी आर मधील भटक्या कुत्र्याची रवानगी निवारागृहा मध्ये करावी आडे आदेश सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच दिले आहेत देशात हा प्रयोग सर्व ठिकाणी राबवण्याचा विचार झाल्यास निवारा गृहासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येणार आहे या शिवाय त्यांच्या पालन पोषणासाठी तसेच त्यांच्या लसीकरण व औषधें याकरिता सुद्धा मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतूद करावी लागणार आहे नेदरलंड या देशाने ही समस्या चांगल्या प्रकारे सोडविली आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

## दहीहंडी उत्सव पारंपारिक पद्धतीने साजरा करणे हिताचे

दहीहंडीचा सराव करताना सहाव्या थरावरुन खाली कोसळल्याने मुंबईच्या दहिसर येथील महेश रमेश जाधव या ११ वर्षाच्या कोवळ्या बालकाचा मृत्यू झाल्याची बातमी मन सुन्न करणारी आहे. या कोवळ्या बालकाच्या मृत्यूमुळे दहीहंडी उत्सवातील अधिकाधिक थर लावण्याच्या जीवघेण्या स्पर्धेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दरवर्षी श्रावण महिन्यात येणाऱ्या अनेक सणांपैकी पवित्र्याने भारलेला आणखी एक सण म्हणजे गोकुळाष्टमी. मात्र त्या सणाचे पावित्र्य संपून 'अर्थपूर्ण राजकीयीकरण' होऊन 'दहीहंडी'च्या नावाने 'इव्हेंट' कधी झाला ते कळलेच नाही. आता या सणाचे पूर्णतः व्यावसायिकीकरण झाले आहे. बक्षिसाच्या आकर्षणापोटी थरावर थर रचले जातात. त्यामुळे उंच थरांवरून पडून गेल्या काही वर्षात अनेक तरुण मुले दहीहंडी उत्सवात कायमची अपंग झाली तर काहींना मृत्यूने कवटाळले. सरकारने, दहीहंडी आयोजकांनी, गोविंदा पथकांनी व विशेषतः आपल्या लहान मुलांना वरच्या थरांवर चढण्यासाठी परवानगी देणाऱ्या पालकांनी याचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**दिनविशेष**

# लेखक, नाटककार जयवंत दळवी

जयवंत द्वारकानाथ दळवी हे मराठी लेखक, नाटककार, पत्रकार होते. त्यांचा जन्म १४ ऑगस्ट १९२५ रोजी गोव्यातील हडफडे येथे झाला. मॅट्रिक झाल्यावर मुंबईच्या व्ही.जे.टी.आय. मध्ये टेक्स्टाईल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा घेण्यासाठी अभ्यास करू लागले, पण डिप्लोमा अर्धवट टाकून मुंबईच्या 'प्रभात' दैनिकात ते रुजू झाले. तिथून ते दैनिक 'लोकमान्य'मध्ये गेले. एमएसाठी त्यांनी इमोशन अँड इमॅजिनेशन अँड देयर प्लेस इन लिटरेचर या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला. अमेरिकन सरकारच्या मुंबई येथील माहिती खात्यात (युसीस) त्यांनी नोकरी स्वीकारली.

१९७५ साली वयाच्या पन्नासाव्या वर्षी लेखनासाठी पूर्ण वेळ मिळावा म्हणून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. बालपणापासूनच त्यांच्यावर राष्ट्रसेवा दलाचे संस्कार झाले होते. श्रमदान मोहिमेत ते उत्साहाने भाग घेत असत. त्यांची पहिली कथा 'दातार मास्तर' १९४८ मध्ये प्रसिद्ध झाली आणि त्यानंतर त्यांच्या लेखणीला बहर आला आणि विविध साहित्य प्रकार त्यांनी समर्थपणे हाताळले. गहिवर, एदिन, रुक्मिणी, स्पर्श आदी १५ कथासंग्रह, चक्र, स्वगत, महानंदा, अथांग, अल्बम आदी २१ कादंबऱ्या, तर संध्याछाया, बॅरिस्टर, सूर्यास्त, महासागर, पुरुष, नातीगोती आदी १९ नाटके दळवींनी लिहिली. ङ्गलोक आणि लौकिकफ हे प्रवासवर्णन आणि ङ्गसारे प्रवासी घडीचेफ हे कोकणातील विलक्षण व्यक्तींचे नि त्यांच्या जगावेगळ्या कर्तृत्वाचे, विक्षिप्तपणाचे चित्रण करणारे विनोदी पुस्तक वाचकप्रिय ठरले.जयवंत दळवींची 'चक्र'ही पहिलीच कादंबरी मराठी कादंबरीच्या अनुभव क्षेत्राची कक्षा वाढवणारी आणि प्रादेशिकतेची कोंडी फोडणारी, अगदी वेगळ्या विषयावरची कादंबरी म्हणून वाखाणली गेली. जयवंत दळवींच्या सर्वच लेखनात सहजपणा आहे. वाचकांना खिळवून ठेवण्याची ताकद आहे. वाट्याला आलेल्या विलक्षण, व्यामिश्र अनुभवांनी अंतर्यामी उदास असणाऱ्या माणसांच्या व्यथा-वेदनांचे खिन्न करणारे चित्रण करणाऱ्या या प्रतिभावंताने एक मुखवटा धारण केला होता, त्याचे नाव 'ठणठणपाळ!' लौकिक जगात दिसणारे दळवींचे रूप प्रसन्न, विनोदी, मिश्कील बोलणारे, चेष्टा करणारे, दुसऱ्यांच्या विनोदाला खळखळून हसून दाद देणारे असे होते. 'सारे प्रवासी घडीचे'मध्ये अस्सल कोकणी माणसांची व्यक्तिचित्रे दळवींनी रंगवली. वरून भोळीभाबडी वाटणारी पण मोठी बिलंदर माणसे दळवींनी या पुस्तकात उभी केली आहेत. ठणठणपाळ हे टोपणनाव धारण करून 'ललित' मासिकात त्यांनी 'घटका गेली पळे गेली' हे सदर २० वर्षे चालवले. अत्यंत मार्मिक आणि तरल विनोदाचा वस्तुपाठच त्यांनी जाणत्या वाचकांसमोर ठेवला. मराठी वाङ्मयातील वाङ्मय समीक्षेतील आणि एकंदर वाङ्मय व्यवहारातील अनिष्ट, अर्थशून्य आणि वाङ्मयविकासाला मारक ठरणाऱ्या अनेक विविध प्रवृत्तींचे फुगे त्यांनी हसत हसत फोडून टाकले. 'ठणठणपाळ'विषयी ज्ञानपीठकार कविवर्य विंदा करंदीकरांनी म्हटले आहे की, ठणठणपाळच्या भूमिकेतून दळवींनी केलेल्या लिखाणाला व कार्याला तोड नाही. इतकी जागरूकता, इतके शहाणपण, इतका जिव्हाळा आणि परखडपणा मराठी समीक्षात्मक विभागाला अजूनपर्यंत लाभलेला नव्हता. दळवींनी वयाची सत्तरी पूर्ण केली, त्यानिमित्ताने त्यांच्या मित्र परिवाराने महाराष्ट्रभूषण सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या हस्ते त्यांचा मुंबईत भव्य सत्कार केला गेला. सत्कार समारंभ ४ सप्टेंबर ९४ ला पार पडला. त्यानंतर त्यांच्या जगण्यात नि बोलण्यात निराशेचा सूर जाणवू लागला. बोलता बोलता ते सहज बोलून गेले की मृत्यूचे ढग जवळ दिसत आहेत. कोण जाणे, त्यांना या क्षणाची चाहूल आधीच लागली असावी. अशा या प्रतिभावान लेखकाचे १६ सप्टेंबर १९९४ रोजी निधन झाले.

कृषीवल
| रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# डिजिटल अरेस्टचा घोटाळा

## ● डॉक्टरसह गृहिणीची दीड कोटींची फसवणूक

**| नाशिक | प्रतिनिधी |**

**डिजिटल अरेस्ट अशी कोणतीही कारवाई पोलिसांसह कोणत्याही तपास यंत्रणेकडून केली जात नाही. त्याबाबत वारंवार जनजागृती होत असतानाही, सायबर भामट्यांनी शहरातील एका डॉक्टर आणि एका गृहिणीला आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी अटकेची भीती दाखवून त्यांच्याकडून तब्बल दीड कोटी रुपये उकळत फसवणूक केली आहे. याप्रकरणी शहर सायबर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर भामट्यांनी हा प्रकार २८ जुलै ते ९ ऑगस्ट २०२५ दरम्यान केला आहे.**

शहरातील डॉक्टराला प्रदीप सावंत या संशयित सायबर भामट्याने व्हॉटसॲपवरून संपर्क साधला आणि कधी कॉल तर कधी चॅटिंग करीत त्यांना मुंबईच्या सायबर क्राईम ऑफिसमधून बोलत असल्याचे भासविले. डॉक्टरचा मोबाईल क्रमांक आणि आधारकार्डचा वापर करीत नरेश गोयलच्या मनीलॉड्रिंग प्रकरणात सहभाग असल्याचे सायबर पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाल्याचे त्यांना सांगितले. व्हिडिओ कॉल करीत संशयित सायबर भामट्याने पोलीस असल्याचा आणि पोलीस ठाण्याचे सेटअप असा बनाव रचून डॉक्टरला अटकेची भीती दाखविली. तसेच त्यांचे आर्थिक व्यवहारांची तपासणी करण्यासाठी त्यांच्या बँक खात्यांची माहिती मागविली. त्याचप्रमाणे डॉक्टराला त्यांच्या बँक खात्यातून १ कोटी १३ लाख ३३ हजार रुपये सायबर भामट्यांनी सांगितलेल्या बँक खात्यावर वर्ग करण्यास सांगितले. डॉक्टरनेही अटकेच्या भितीपोटी सायबर भामट्याने सांगितल्याप्रमाणे सदरची रक्कम ऑनलाइन वर्ग केली.



अशाचरितीने शहरातील एक गृहिणीला मनीलॉड्रिंगच्या नावाखाली अटकेची भिती दाखवली. त्यानंतर त्यांच्या बँक खात्यांतील आर्थिक व्यवहारांची पडताळणीच्या नावाखाली त्यांना ३३ लाख रुपये भामट्यांनी वेगवेगळ्या बँक खात्यावर भरावयास भाग पाडले.

अशाप्रकारे सायबर भामट्यांनी डॉक्टरसह गृहिणीला डिजिटल अरेस्टची भीती दाखवून सुमारे १ कोटी ४६ लाख ३० हजार रुपयांचा गंडा घातला आहे. याप्रकरणी शहर सायबर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

> पोलिसांसह कोणत्याही तपास यंत्रणेकडून डिजिटल अरेस्ट केली जात नाही. पोलिस व्हिडिओ कॉल करून बँकेची माहिती मागवित नाहीत. याबाबत जनजागृती केली जात असतानाही सायबर भामट्यांच्या जाळ्यात नागरिक फसतात. ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाल्यास २४ तासांत सायबर पोलिसांकडे तक्रार केल्यास कारवाई करणे शक्य होते.
>
> – सुभाष ढवळे,
> वरिष्ठ निरीक्षक,
> शहर सायबर पोलीस ठाणे

# शिळ्या अन्नातून विद्यार्थ्यांना विषबाधा

**| नागपूर | प्रतिनिधी |**

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालयामार्फत चालवल्या जाणाऱ्या जांभुळघाट येथील आदिवासी शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांची प्रकृती खालावल्याने मोठी खळबळ उडाली. शाळेतील एकूण ५३८ विद्यार्थ्यांपैकी २६७ विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याचा आरोप आदिवासी संघर्ष समितीने केला आहे. यातील ९ विद्यार्थ्यांना उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली. मुलींना रक्ताच्या उलट्या, हातापायांना सूज, चक्कर येणे अशी लक्षणे दिसू लागली. आदिवासी संघर्ष समिती सदस्यांनी शाळेत जाऊन विचारपूस केली असता शिळे अन्न दिल्याची माहिती मिळाली. एकावेळेस अनेक विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना जांभुळघाट येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात भरती करण्यात आले. सध्या वेदीका चौधरी (वर्ग ४), राजेश नानाजी राजनहिरे (वर्ग ७), ऋतुजा आशीष चौधरी (वर्ग १०), चांदणी इंदरशहा सिडाम (वर्ग ९), स्नेहा नरेंद्र गायकवाड (वर्ग ७), मोनाली अनिल धुर्वे (वर्ग ७), शर्वरी केशव दोडके (वर्ग १०), शिवाणी अंकोष चौधरी (वर्ग ८) आणि अंजली उमेश फरंदे (वर्ग ४) यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, या विद्यार्थ्यांना नेमका कशाचा त्रास झाला याचा शोध घेतला जात असून त्यांच्या विविध तपासण्या केल्या जात आहेत, अशी माहिती आदिवासी विकास विभागाने दिली आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१४ ऑगस्ट**

१)श्री. गिरीधर गजानन गुरव
मु.आंबेपूर, अलिबाग,
१४-८-१९४३
२)श्री.दिनकर सखाराम गिरकर
अलिबाग १४-८-१९४३
३)श्री.जगन्नाथ नारायण महाले
मु.किहीम, अलिबाग १४-८-१९३८
४)श्री.अरविंद वामन पडते
मु.गुंजीस, अलिबाग १४-८-१९५५
५)श्री.परशुराम जानू गोंधळी
मु.उसर, अलिबाग १४-८-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. सौ. कलावती भवानजी देढीया स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**

**तरुण नंदकुमार सक्सेरिया मुंबई**



**कै मधुसूदन अनंत अनगळ, स्मरणार्थ अलिबाग**



**कै.रविंद्र विठ्ठल कुंटे, २२ वा स्मृतिदिन, जूनी कुंटे खाणावळ, बाजार पेठ अलिबाग**

## रूळ ओलांडताना पोलिसाचा मृत्यू

**मुंबई :** कांदिवलीच्या समता नगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस हवालदार गणेश राऊळ (३२) कांदिवलीच्या समता नगर पोलीस ठाण्यात कार्यरत होते. ते नालासोपारा येथे पत्नी आणि दोन मुलांसह रहात होते. ते मंगळवारी कामावर जाण्यासाठी नालासोपारा स्थानकात आले. फलाट क्रमांक ४ वरून चर्चगेटच्या दिशेने जाणारी लोकल त्यांना पकडायची होती. मात्र उशीर झाल्याने त्यांनी जीन्याचा वापर न करता रुळ ओलांडायचा प्रयत्न केला. दुपारी २.३० च्या सुमारास त्यांना लोकलने धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी झाले. उपचारासाठी त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. मात्र गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

## टेम्पो अपघातात एकाचा मृत्यू

### सात महिला गंभीर जखमी

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

राजापूर तालुक्यातील मीठगवाणे येथील सागरी महामार्गावर बुधवारी (दि. १३) सकाळी ९.१५ वाजण्याच्या सुमारास टेम्पोचा भीषण अपघात झाला. यात एका महिलेचा मृत्यू झाला असून सात महिला गंभीर जखमी झाल्या आहेत.

वाघ्रण येथून बागकामासाठी जानशी पठाराकडे निघालेल्या महिलांचा टेम्पो समोरून जात असलेल्या लक्झरी बसला ओव्हरटेक करत असताना चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. त्यामुळे वाहन उलटले आणि सुमारे १०० ते १५० फूट फरफटत गेले. या अपघातात टेम्पोतील सर्व महिला व एक छोटी मुलगी गंभीर जखमी झाली. तसेच टेम्पोचालक आणि केबिनमधील इतर पुरुष प्रवासीही जखमी झाले.

सर्व जखमींना स्थानिक नागरिकांच्या मदतीने तत्काळ जैतापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. त्यानंतर अधिक उपचारासाठी त्यांना रत्नागिरी सिव्हिल हॉस्पिटल येथे हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान एका महिलेचा मृत्यू झाला.

## गांधीचौक परिसरातील दुकानाला आग

**चिपळूण :** बाजारपेठेतील गांधीचौक येथील एका कॉम्प्लेक्समध्ये गजानन स्टोअर्सचे दुकान आहे. मंगळवारी (दि. १२) दुपारी १ वाजताच्या सुमारास येथे अचानक शॉर्टसर्किटने आग लागली. दुकानात पुस्तके, वह्या व अन्य शैक्षणिक साहित्य होते, तसेच येथे अन्य दुकानेही लागूनच असल्याने या घटनेची माहिती तातडीने नगरपालिकेच्या अग्निशमन दलाला देण्यात आली. बंबासह काही मिनिटातच यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. शॉर्टसर्किटने आग लागल्याने या भागातील वीजपुरवठा तातडीने बंद करण्यात आला. या घटनेत दुकानदाराचे किरकोळ नुकसान झाले आहे.

## गुटख्याच्या तस्करीप्रकरणी चौघेजण अटकेत

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

देवरूख पोलिसांनी कोल्हापूरहून रत्नागिरीकडे गुटख्याची तस्करी करणाऱ्या एका टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ९ लाख ४१ हजार रुपयांचा गुटखा आणि वाहन जप्त केले असून, चार आरोपींना ताब्यात घेतले आहे.

सोमवारी रात्री २.३० च्या सुमारास देवरूख पोलीस निरीक्षक उदय झावरे आपल्या सहकाऱ्यांसह दाभोळे येथे गस्त घालत असताना त्यांना एक संशयास्पद गाडी उभी दिसली. पोलिसांनी गाडीजवळ जाण्याचा प्रयत्न करताच, चालकाने गाडी वेगाने पळवून नेली.

पोलिसांनी तात्काळ त्या गाडीचा पाठलाग सुरू केला आणि हातखंबा ग्रामीण पोलिसांना याबाबत माहिती दिली. हातखंबा येथे देवरूख आणि ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त पथकाने गाडी अडवून ती ताब्यात घेतली. गाडीची तपासणी केली असता, त्यात बेकायदेशीरपणे विक्रीसाठी नेला जात असलेला मोठ्या प्रमाणात गुटखा आढळून आला.




या कारवाईत पोलिसांनी गाडीतील चौघांना ताब्यात घेतले असून, गुटखा आणि गाडीसह एकूण ९ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या सूचनेनुसार पोलिसांनी अंमली पदार्थ विरोधी मोहीम अधिक तीव्र केली असून, रात्रीची गस्त वाढवली आहे. देवरूख पोलिसांच्या या धडाकेबाज कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गणपतीपुळे मंदिरात ड्रेसकोड लागू

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून विविध मंदिरात ड्रेसकोड लागू करण्यासंदर्भाने विचार केला जात आहे. तर, काही मंदिरात तसा प्रयत्न देखील झाला आहे. मुंबईतील श्री सिद्धिविनायक गणेश मंदिरात ३० जानेवारी २०२५ पासून ड्रेसकोड लागू करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कोकणातील प्रसिद्ध निसर्गरम्य ठिकाण आणि देवस्थान असलेल्या गणपतीपुळे मंदिरातही भाविकांना ड्रेसकोड लागू करण्यात आला असून भाविकांसाठी वेशभूषा नियमावली जाहीर झाली आहे.



गणपतीपुळे महाद्वाराजवळ मंदिर प्रशासनाकडून वेशभूषेसंदर्भात व नव्या ड्रेसकोड प्रणालीसंदर्भात बोर्ड लावण्यात आला आहे. त्यामुळे, आता भाविकांना पूर्ण पोशाख परिधान करूनच मंदिरात यावे लागणार आहे. याबाबत मंदिर प्रशासनाने भाविकांना वेशभूषेसंबंधी नियम पाळण्याचे आवाहन केले आहे. कमी कपड्यातील ट्रीप मूड अथवा समुद्रावर जाण्यासाठी करण्यात येणारा पेहराव टाळण्याचे आवाहन देखील मंदिर प्रशासनाने केले आहे.

महिला किंवा मुलींसाठी गुडघ्यांच्या वर येणारे स्कर्ट्स किंवा शॉर्ट ड्रेसेस परिधान करू नयेत, असभ्य भाषा किंवा आक्षेपार्ह चित्र असलेले कपडे टाळावे असेही सांगण्यात आले आहे. तसेच, आक्षेपार्ह भाषा किंवा चित्र असलेल्या, तोकड्या अशा कपड्यातील मंडळींना दर्शनासाठी मंदिरात प्रवेश निषिद्ध असेल. केवळ १० वर्षांच्या आतील मुलांना ह्या नियमातून सूट असेल, असेही मंदिर प्रशासनाने म्हटले आहे.

## वैनगंगा नदीत तीन तरुण बुडाले

**नागपूर :** बालाघाट जिल्ह्यातील वारासिवनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मंगळवारी (दि. १२) संध्याकाळी ५ वाजण्याच्या सुमारास, मोहित महेश बुर्डे (२०), अखिल चमनलाल बुर्डे (२१) आणि राकेश नंदनवार हे तिघेही तरुण रामपायली तालुक्यातील वैनगंगा नदीत आंघोळीसाठी गेले होते. त्यांच्यासोबत अखिलचे वडील चमनलाल बुर्डे देखील नदीकाठी उपस्थित होते. आंघोळ करत असताना, तिन्ही तरुण नदीच्या खोल पाण्यात गेले आणि बुडू लागले. चमनलाल यांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र ते तिघेही वाहून गेले.


## व्यावसायिक वादातून दुहेरी हत्याकांड

**| ठाणे | प्रतिनिधी |**

व्यावसायिक वादातून झालेल्या दुहेरी हत्याकांडाने भिवंडी तालुका हादरला आहे. खारबाव चिंचोटी मार्गावरील खार्डी गावात दोघा तरुणांवर प्राणघातक शस्त्रांनी हल्ला करून त्यांची हत्या केली. प्रफुल्ल तांगडी व तेजस तांगडी अशी मृत तरुणांची नावे आहेत.

सोमवारी रात्री प्रफुल्ल आपला सहकारी तेजस हा खार्डी गावातील घरापासून काही अंतरावर असलेल्या जेडीटी इंटरप्रायसेस या आपल्या कार्यालयात बसला होता. रात्री ११ वाजता दोघे घरी जाण्यासाठी निघत असतानाच दबा धरून बसलेल्या हल्लेखोरांनी प्राणघातक शस्त्रांसह हल्ला केला. या हल्ल्यात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात मृतदेह शवविच्छेदनासाठी आणल्यानंतर तेथे कुटुंबीयांसह ग्रामस्थांनी धाव घेतली. घटनास्थळी पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांच्यासह मोठा पोलीस फौजफाटा दाखल झाला होता. प्रफल्ल यांचा चुलतभाऊ उमेश तांगडी याने दिलेल्या तक्रारीवरून भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात विकी म्हात्रे, कल्पेश वैती, अजय तांगडी, महेंद्र तांगडी, दयानंद तांगडी, सुनील भोईर, प्रसाद तांगडी, मोहन तांगडी, नऊस नांदुरकर, विजय मुकादम, रवींद्र मुकादम व जितेश गवळी अशा १२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सुवर्णकण



आत्मसाक्षात्कार याच्या प्रांजळ इच्छेने केलेल्या प्रामाणिक साधनेमुळे सिद्धी प्राप्त होतात व त्यायोगे चमत्कार वाटतील अशा घटना घडविता येतात असा सर्व संतांचा अनुभव आहे.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी,**
**पेण.**

# इडली वड्यात आढळली अळी

**| मुंबई | प्रतिनिधी |**

कल्याण पश्चिमेला एका इडली डोसा सेंटरवर इडली वडा खाण्यासाठी गेलेल्या ग्राहकाच्या इडली वड्यामध्ये चक्क अळी पडल्याची घटना घडली आहे. यामुळे संतापलेल्या ग्राहकाने याविषयी दुकानदाराकडे तक्रार केली असता दुकानदाराने ग्राहकाला मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पालिकेने दुकानातील सामान जप्त केले आहे. तर महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कल्याण पश्चिम परिसरातील कर्णिक रोडवरील बंगलोर इडली कॅफे येथे ही घटना घडली आहे. तक्रारदार प्रथमेश गोरख शिंदे यांचा मुलगा १२ ऑगस्टला दुपारी २ च्या सुमारास दुकानातून एक वडा सांबर प्लेट आणि एक इडली प्लेट खरेदी केली होती. ते पार्सल कुटुंबातील सदस्यांना दिलं असता, तक्रारदारांनी स्वतः खाण्यास घेतलेल्या इडली वड्यामध्ये जिवंत अळी त्यांना दिसून आली. याविषयी त्यांनी दुकानदार लिंगराज लिगे गौडा यांच्याकडे जाऊन त्यांना त्याची माहिती दिली. मात्र दुकानदाराने ती इडली फेकून देऊन अरेरावीची भाषा केली. यानंतर तक्रारदाराने महानगरपालिकेमध्ये नागरिकांच्या आरोग्याची खेळ असल्याची तक्रार केली. दाखल तक्रारीनुसार पालिकेने देखील या दुकानावर कारवाई करत दुकानातील सर्व खाद्यसाहित्य जप्त केले. यामुळे संतापलेल्या दुकानदाराने तक्रारदाराला तुला बघून घेतो अशी धमकी दिली.

## लाच घेताना पोलीस कर्मचारी ताब्यात

**श्रीगोंदे :** एका प्रकरणात तक्रारदाराच्या मुलाचा मोबाईल संबंधित पोलिसाने ताब्यात घेतला होता. तो मोबाईल परत देण्यासाठी श्रीगोंदे पोलीस ठाण्यातील पोलीस कॉन्स्टेबल संभाजी शिवाजी घोडे (३२) याने तक्रारदाराकडे २० हजारांची मागणी केली. याबाबत संबंधित व्यक्तीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली असता मंगळवारी (दि. १३) दुपारी तीन हजार रुपयांची लाच घेताना घोडे याला रंगेहाथ पकडण्यात आले.

## ‘ठेकेदारांनी गणेशोत्सव साजरा करायचा की नाही?’

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना देखील ठेकेदारांच्या देयकांचा अद्यापही थांगपत्ता नाही. त्यामुळे आम्ही गणेशोत्सव साजरा करायचा की नाही? असा संतप्त सवाल चिपळूण तालुका ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष सुरेश चिपळूणकर यांनी उपस्थित केला आहे.



सुरेश चिपळूणकर म्हणाले की, ठेकेदारांनी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत असलेली कामे बँकांकडून कर्ज काढून उसनवारी करून पूर्ण केलेली आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील ठेकेदारांची सुमारे ७०० ते ८०० कोटी रुपयांची देयके थकीत आहेत. यामध्ये उत्तर रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे २०० कोटी रुपयांची देयके थकीत आहेत. मात्र, ही देयके गेल्या काही महिन्यांपासून मिळालेली नाहीत. यामुळे बँकांकडून काढलेली कर्ज थकीत असून दिवसेंदिवस व्याज देखील वाढत आहे. पर्यायाने भविष्यात कर्ज मिळणे अवघड होऊन बसले आहे. याचबरोबर देणेकऱ्यांनी देखील पैशांसाठी तगादा लावला आहे. यामुळे ठेकेदार आर्थिक तणावाखाली येऊन आत्महत्या तर करणार नाहीत ना, याची चिंता भेडसावत आहे. आता तर गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. तरीही ठेकेदारांची देयके अदा करण्यासंदर्भात शासनाकडून अद्यापही कोणतीही पावले उचलली दिसत नाहीत. यामुळे आम्ही गणेशोत्सव साजरा करायचा की नाही? असा प्रश्न पडला आहे, अशी माहिती सुरेश चिपळूणकर यांनी दिली.

# शॉक लागून कामगाराचा मृत्यू

**| अकोला | प्रतिनिधी |**

अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात येणाऱ्या वडगाव रोठे गाव येथील रहिवासी वसंता बरिंगे यांच्या घरी स्लॅब टाकण्याचे काम सुरू होते. दरम्यान मंगळवारी रात्री उशिरापर्यंत घराच्या स्लॅबचे काम पूर्ण झाले. बांधकाम आटोपल्यानंतर सिमेंट काँक्रेटचे मिक्सर बाजूला काढले जात असताना या मिस्करचा विजेच्या ताराचा स्पर्श झाल्याने त्यामध्ये विजेचा प्रवाह आला. त्यामुळे मिक्सरला स्पर्श केलेल्या १४ मजुरांना विजेचा झटका बसला. या घटनेमध्ये एका अल्पवयीन मजुराचा मृत्यू झाला आहे. ओम प्रकाश केशवराव जांभळे (१७) असे मृत कामगार मुलाचे नाव आहे. तो बुलढाणा जिल्ह्यातील वसाडी गावातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली.



या प्रकरणात तेल्हारा पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे. विजेचा धक्का बसलेल्या मजुरांपैकी सात ते आठ जण जखमी झाले असून त्यांच्यावर तेल्हाराच्या ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. या दुर्दैवी घटनेनंतर संबंधित बांधकाम ठेकेदार घटनास्थळावरून पसार झाला. तेल्हारा पोलीस त्याचा शोध घेत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर दुर्घटनेत मृत्यू झालेल्या मुलाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे.

### युवा स्वयंसेवकांना सहभागी करून घेणार | १५ ऑगस्टपासून होणार अंमलबजावणी

# ‘रस्ता सुरक्षा मित्र’ उपक्रमातून जनजागृती

**| पुणे | प्रतिनिधी |**

रस्ता सुरक्षेसंदर्भात व्यापक जनजागृती करण्यासाठी राज्यातील १९ जिल्ह्यांमध्ये ‘रस्तासुरक्षामित्र’ हाउपक्रमराबवण्यातयेणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालय, युवक आणि क्रीडा मंत्रालय यांच्यातर्फे राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाणार असून, १५ ऑगस्टपासून या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

रस्ते अपघात ही देशातील मोठी समस्या आहे. २०२२ मध्ये देशात ४ लाख ६१ हजार ३१२ अपघातांची नोंद झाली होती. त्यात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये २५ वर्षांखालील तरुणांची संख्या २५ टक्के आहे. आपत्कालीन स्थितीमध्ये मदत मिळण्यास उशीर झाल्याने, प्रथमोपचारांची माहिती नसल्याने, सामाजिक पातळीवर सहभागाचा अभाव यामुळेही बरेच मृत्यू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर रस्ता सुरक्षेबाबत तातडीने जिल्हा, स्थानिक पातळीवर काम करण्याची गरज व्यक्त करून केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालय, युवक आणि क्रीडा मंत्रालयाने युवा स्वयंसेवकांना सहभागी करून घेणारा ‘रस्ता सुरक्षा मित्र’ हा उपक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी देशभरातील १०० जिल्हे निश्चित करण्यात आले आहेत.



उपक्रमामध्ये राज्यातील नाशिक, पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, जळगाव, सातारा, छत्रपती संभाजीनगर, बीड, नागपूर, धुळे, यवतमाळ, जालना, अमरावती, कोल्हापूर, नांदेड, चंद्रपूर, बुलढाणा, सांगली, मुंबई या जिल्ह्यांचा समावेश आहे. उपक्रमासाठी उच्च माध्यमिक ते पदवी अभ्यासक्रमाच्या १८ ते २८ या वयोगटातील विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षित स्वयंसेवकांकडून हेल्मेटचा वापर करणे, सीट बेल्ट लावणे, वेगमर्यादेचे पालन करणे याबाबत जागृती करण्यात येईल. या उपक्रमातून आपत्कालीन परिस्थितीत झटपट प्रतिसाद आणि योग्य व्यवस्थापन, समाज सुरक्षेमध्ये तरुणांचा सहभाग, विद्यार्थी, प्रशासन आणि स्थानिक अधिकारी यांच्यात समन्वय, रस्ते सुरक्षा मंडळ यांच्याशी समन्वय उपक्रमात उत्तम काम करणाऱ्या स्वयंसेवकांना प्रमाणपत्र प्रदान केले जाणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### क्षेत्रभेटींद्वारे अभ्यास करण्याची संधी

उपक्रमात सहभागी स्वयंसेवकांना क्षेत्रभेटींद्वारे अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. रस्ते सुरक्षेतील अडचणी लक्षात घेऊन उपाययोजना सुचवणे, ब्लॅकस्पॉट आणि ठिकाणे निश्चित करणे, ग्रीन कॉरिडॉर्स तयार करणे, अपघातस्थळी मदत करणे अशा कामांचा समावेश आहे. त्यासाठी त्यांना जिल्हा प्रशासन, महापालिका प्रशासन, पोलीस, वैद्यकीय अशा विभागांबरोबर काम करता येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# डेंग्यु विरोधात हिवताप विभाग सक्रीय

## बदलत्या वातावरणामुळे रुग्णांच्या संख्येत वाढ; आजार रोखण्याचा केला जातोय प्रयत्न

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यामध्ये पावसाची ये-जा सुरू आहे. वातावरणाचा परिणाम मानवी आरोग्यवर होऊ लागल्यामुळे तापाचे रुग्ण वाढत आहे. त्या पार्श्वभूमीवर मलेरिया, डेंग्यु विरोधात हिवताप विभाग सक्रीय झाला आहे. ठिकठिकाणी सर्वेक्षण पडताळणी सुरु करण्यात आली असून कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन देखील हिवताप विभागाकडून करण्यात आले आहे.**



जिल्ह्यामध्ये सध्या पावसाळी हंगाम सुरू आहे. कधी ऊन कधी पाऊस असे वातावरणात बदल होत आहे. काही सखल भागांमध्ये पाणी साचून राहत आहे. त्याचा परिणाम डासांमुळे डेंग्यू, मलेरिया सारखे आजार होण्याची भिती आहे. बदलत्या वातावरणामुळे ताप रुग्णांची संख्या वाढत आहे. खासगी दवाखान्यांसह सरकारी दवाखान्यात उपचारासाठी रुग्णांची धावाधाव सुरू झाली आहे.

सतत तापाचे रुग्ण वाढत असल्याने त्यांच्या रक्तांच्या नमुन्यांची तपासणी केली जात आहे. पावसाळ्यामध्ये डेंग्यू, मलेरिया सारख आजार होण्याची भिती कायमच असते. जिल्ह्यात सध्या वातावरणात अमुलाग्र बदल होत आहे. या बदलाचा परिणाम मानवी आरोग्य होऊ लागला आहे.

लहान मुलांपासून वयोवृध्द मंडळींना तापाची साथ सुरु झाली आहे. डेंग्यू, मलेरिया आजारावर नियंत्रण ठेवण्यापासून हे आजार होऊ नये, म्हणून जिल्हा हिवताप विभागाने कंबर कसली आहे. जिल्ह्यातील आरोग्य व उपकेंद्राअंतर्गत बैठका घेण्यापासून वैद्यकिय अधिकारी, सामुदायिक आरोग्य अधिकारी, आशा स्वयंसेविका यांच्या मदतीने हा आजार रोखण्याचा प्रयत्न केला जात आहे.

### अधिकाऱ्यांच्या गावांना भेटी

पेण तालुक्यातील जिते येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, रावे, उपकेंद्र अंतर्गत खैरासवाडी या ठिकाणी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अश्वीनी सपकाळ यांनी भेट दिली. गावातील किटक शास्त्रीय सर्वेक्षण, जलद ताप सर्व्हे, कंटेनर सर्व्हे आदी कामांची पाहणी करून आढावा घेण्यात आला. ताप रुग्णांची भेट घेऊन त्यांच्या उपचारांसबंधित माहिती घेतली. घराच्या अवती भोवती पाणी साचू न देणे, घरामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साठा न करणे अशा अनेक सुचना दिल्या.

### दवंडीद्वारे जनजागृती

गावांमध्ये धुर फवारणी करणे, स्वच्छता राखणे, गावांमध्ये कोरडा दिवस पाळणे, किटकजन्य, जलजन्य व साथरोगांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले जात आहे. दवंडीद्वारे गावागावात जनजागृतीदेखील करण्याच्या सुचना जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आल्या आहेत.

> "दर आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळावा, ज्यामुळे डासांची उत्पत्ती थांबेल, घरात व आजूबाजूच्या परिसरात पाणी साचू देऊ नका. परिसर स्वच्छ ठेवा. आजाराची लक्षणे दिसल्यास त्वरित नजीकच्या दवाखान्यात जाऊन वेळेवर उपचार नागरिकांनी करून घ्यावे.
> -डॉ. अश्वीनी सपकाळ
> - जिल्हा हिवताप अधिकारी, रायगड"

# इको सेन्सेटिव्ह झोनविरोधात एल्गार

## रोह्यातील शेतकऱ्यांकडून शासनाला हरकतींचे निवेदन

**। खांब । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील सात तालुक्यात इको सेन्सेटिव्ह झोन लागू करण्यात येणार असल्याचा मसुदा तहसील कार्यालयाकडून जारी करण्यात आला असून, रायगड जिल्ह्यातील तब्बल ४३७ गावे ही इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये येत असल्याचे केंद्र शासनाच्या मसुद्यामध्ये आहे. तर त्यात रोहा तालुक्यातील ११९ गावांना वन व पर्यावरण विभागाने केलेल्या सर्वेक्षणाद्वारे संवेदनशील गावे म्हणून घोषित करत असून, यात धाणमणसई पंचक्रोशीतील गावांचाही समावेश आहे. या अनुषंगाने यावर हरकती घेत विभागातील शेतकरी ग्रामस्थांवर लादले जात असलेले वन पर्यावरण संवेदनशील क्षेत्र हे रद्द करण्यात यावे यासाठी मंगळवार, दि.१२ ऑगस्ट रोजी तहसीलदार, प्रांत अधिकारी व वन अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी ग्रामस्थांनी उपस्थिती दर्शवत वन पर्यावरण संवेदनशील क्षेत्र घोषित रद्द करण्याबाबत हरकत घेऊन निवेदन दिले. केंद्र शासनाचे पर्यावरण, वने व वातावरण बदल मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र घोषित करण्यासाठी जारी केलेली मसुदा अधिसुचना तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सचिव महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, जिल्हाधिकारी यांच्याकडील पत्रान्वये अधिसुचनेनुसार केंद्र शासनाचे पर्यावरण वने व वातावरण बदल मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांनी पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र घोषीत करण्यासाठ अधिसुचना प्रसिध्द केली आहे.

तालुक्यातील एकूण ११९ गावांना अधिसूचना लागु करण्यासाठी जारी केली आहे. त्यावर विरोध दर्शवित तसेच येथील बळीराजा शेतकरी यांची देखील हरकत असून केंद्रीय वन पर्यावरण संवेदनशील क्षेत्र रद्द करण्यात यावा, असे निवेदन रोहा तालुक्यातील धामणसई पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी एकत्र येऊन हरकतीबाबत तहसीलदार, प्रांत अधिकारी व वन अधिकारी यांना देत याबाबत रोहा तहसीलदार, प्रांताधिकारी, उपवन संरक्षण अधिकारी यांना निवेदन देऊन सदरील झोन रद्द करण्याची आग्रही मागणी येथील ग्रामस्थानी केली.



# रक्षाबंधनातून सामाजिक बांधिलकीचा संदेश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पीएनपी होली चाईल्ड वेश्वी शाळेतील दहावीच्या विद्यार्थिनींनी आरसीएफ कुरुळ येथील आत्मनिर्भर विशेष मुलांच्या शाळेतील मुलांसोबत रक्षाबंधनाचा सण साजरा करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. या शाळेतील अध्यक्ष विनायक देशपांडे व मुख्याध्यापिका सुजाता देसाई यांनी शाळेत चालणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली. रक्षाबंधन उपक्रमामुळे विशेष मुलांचा आनंद द्विगुणित झाला. विद्यार्थिनींनी विशेष मुलांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्याशी आपुलकीचा धागा जुळविला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# माणगाव तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार जाहीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सामाजिक कार्यात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगाव तालुका पत्रकार संघाचे विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना सन २०२५ या आठव्या वर्षातील पुरस्कार संघाचे अध्यक्ष सलीम शेख यांनी मंगळवार, (दि. ५) ऑगस्ट रोजी शासकीय विश्रामगृह माणगाव येथे झालेल्या पत्रकार संघाच्या बैठकीत जाहीर केले.

यावर्षीच्या सन २०२५ पुरस्काराचे मानकरी प्राप्ती राज ठाकूर, रा. उरण (आकाश गौरव स्त्रीशक्ती पुरस्कार), आरीफ बामणे, रा. हर्णे दाभोळ (देवदूत पुरस्कार), वैष्णवी मानकर, रा. खरवली, ता. माणगाव (क्रीडा क्षेत्र पुरस्कार), श्रीकांत गणगणे, रा. माणगाव (आदर्शवत प्रशासकीय अधिकारी पुरस्कार), अपूर्वा जंगम, रा. माणगाव (गुणवंत शिक्षक पुरस्कार), संतोष मांजरे, रा. खांदाड -माणगाव (समाजरत्न पुरस्कार), भिकूशेठ धाडवे, रा. मुठवली, ता. माणगाव (आदर्श लोकप्रतिनिधी पुरस्कार), सरिता दपके, रा. माणगाव (आदर्श ग्रामसेविका पुरस्कार), मंगेश मेथा, रा. माणगाव (यशस्वी उद्योजक पुरस्कार), डॉ. चंद्रशेखर साकोलीकर, रा. माणगाव (वैद्यकीय सेवा पुरस्कार), बशीर किरकिरे रा. मोर्बा, ता. माणगाव (समाज गौरव पुरस्कार), इरफान हाजीते, रा. माणगाव (तरुण उद्योजक पुरस्कार), प्राची खेतम, रा. कवीलवहाल, ता. माणगाव (आदर्श महिला सरपंच पुरस्कार), अनिल पवार, रा. लोणेरे, ता. माणगाव (अध्यात्मिक क्षेत्र पुरस्कार), निलेश पवार, रा. महाड (आदर्श पत्रकार पुरस्कार), राजेश गंडाळे, रा. माणगाव (आदर्श कर्मचारी पुरस्कार), निशिगंधा भारमल-सरनाईक रा. माणगाव (आदर्श महिला तलाठी पुरस्कार), दिपक शेरकर, रा. माणगाव (कर्तव्यदक्ष वाहतूक पोलीस पुरस्कार), दिनेश रातवडकर, रा. जुने माणगाव (सामाजिक सेवा पुरस्कार), सुरेखा मारुती तांबट, रा. माणगाव (आदर्शगटशिक्षणाधिकारी पुरस्कार), ज्योती मेथा, रा. माणगाव (हिरकणी पुरस्कार), दिनेश गुगळे, रा. निळगून, ता. माणगाव (सेवाभावी कार्यकर्ता पुरस्कार) तसेच सत्कारमूर्ती- भास्कर सखाराम म्हस्के, रा. मुगवली, ता. माणगाव, भगवान पोवार, रा. खांदाड-माणगाव, चंद्रकांत धारिया, रा. माणगाव, उषा मेहता, रा. माणगाव, प्रदीप गांधी, रा. माणगाव, पूनम दोशी, रा. माणगाव यांना जाहीर झाले आहेत.

# साळाव ते तळेखार रस्त्याच्या दुरवस्थेबाबत जनआक्रोश

## बिर्ला मंदिर येथे रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

साळाव ते तळेखार रस्त्याच्या दुरवस्थेबाबत जनआक्रोश असून, येत्या १८ ऑगस्ट रोजी साळाव बिर्ला मंदिर येथे रास्ता रोको आंदोलन छेदण्यात येईल, असा इशारा माजी जि.प. सदस्या राजश्री मिसाळ यांनी जिल्हाधिकारी रायगड, पोलीस अधीक्षक आदींना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. या आंदोलनात साळाव ते तळेखार तसेच चणेरा विभागातील सर्व नागरिकांचा, वाहनचालकांचा समावेशक सहभाग असणार आहे. या आंदोलनाचे नेतृत्व शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे व शिवसेना उबाठा उपजिल्हा प्रमुख प्रशांत मिसाळ करणार आहेत.



गेल्या सहा महिन्यांपासून साळाव ते तळेखार या मुख्य रस्त्याचे काम चालू आहे. १३ किलोमीटर अंतरात दोन्ही बाजूचा रस्ता कंत्राटदाराने उखडून ठेवलेला आहे. एमएसआयडीसी व कंत्राटदार यांच्या नियोजनशून्य कारभारामुळे याचा नाहक त्रास या परिसरातील विद्यार्थी, नागरिक आणि सर्व प्रवाशांना सहन करावा लागत आहे. येत्या गणेशोत्सवासाठी या परिसरातील मुंबईत असलेले चाकरमानी हजारोंच्या संख्येने गावी येणार आहेत. तसेच रेवदंडा ही या विभागाची मुख्य बाजारपेठ असल्याने या रस्त्यावरील रहदारी वाढणार आहे. दरम्यान, भरपावसात प्रवास करत असताना नागरिकांची अवस्था अधिकच वाईट होणार आहे.

येत्या काळात या रस्त्यावर कोणतीही दुर्घटना घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी एमएसआयडीसी व कंत्राटदार यांची असणार आहे. एमएसआयडीसीचे अधिकारी प्रत्यक्ष काम चालू असताना उपस्थित नसतात त्यामुळे कामाची गुणवत्ता निकृष्ट होत आहे. तसेच एखाद्या स्थानिक नागरिकाने परप्रांतीय असलेल्या अभियंत्याला अथवा कर्मचाऱ्याला जाब विचारणा केल्यास त्या नागरिकांची त्वरित तक्रार पोलीस ठाण्यात केली जाते. एमएसआयडीसीचा बेजबाबदारपणा व मुजोर कंत्राटदाराला एकत्रित जाब विचारण्यासाठी सोमवार, दि. १८ ऑगस्ट रोजी दुपारी बारा वाजता बिर्ला मंदिर येथे सुरेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली साळाव ते तळेखार विभागातील सर्व नागरिकांचा जनआक्रोश रास्ता रोको आंदोलन आयोजित केला आहे.

### रेल्वेतून बॅग पळवली

**पनवेल :** रक्षाबंधनासाठी बहिणीकडे चाललेल्या व्यक्तीची रेल्वेतून बॅग चोरीला गेल्याची घटना घडली आहे. या बॅगेमध्ये त्यांचा लॅपटॉप व मोबाइल होता. सायन येथे राहणारे सिद्धांत सायगावकर (२५) हे रेल्वेने पनवेलला जात होते. दरम्यान, त्यांनी रेल्वेत ठेवलेली बॅग चोरट्यांनी पळवली. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सुभाष दत्तात्रेय महाडिक यांचे निधन

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**



मुरुड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष दत्तात्रेय महाडिक यांचे मंगळवारी पहाटे नवी मुंबई येथील एमजीएम रुग्णालयात वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य, मुरुड तालुका काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष, भोईघर ग्रामपंचायत हद्दीतील बारशिव गावाचे सुभाष महाडिक यांनी सामाजिक राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले.

सन १९९७ ते सन.२००२ मध्ये रायगड जिल्हा परिषदेत सदस्यपदी तालुक्याच्या विकासासाठी योगदान दिले. माजी केंद्रीय मंत्री तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांचे ते स्नेही होत. रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी त्यांनी चांगले काम केले. मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्यपदी गेल्या पंधरा वर्षांपासून व सन २०१४ पासून मुरुड तालुका काँग्रेस पक्षाच्या तालुका अध्यक्षपदी कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, शैलेश व सुमित ही दोन मुले, सुना, मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

## विधानसभेच्या निवडणुकीत वाढलेल्या मतांबद्दल शंका | काँग्रेसकडून तहसीलदारांना मागणीचे निवेदन

# आगामी निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडून मतांच्या चोरीबद्दल देशभर आंदोलने उभे केले आहे. त्यात कर्जत तालुका काँग्रेस कमिटीने तहसीलदार यांची भेट घेऊन निवेदन दिले. आगामी सर्व निवडणुकीसाठी मतदान ही बॅलेट पेपरवरच व्हावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली.**




कर्जत तालुका काँग्रेस कमिटीचे पदाधिकाऱ्यांनी राहुल गांधी यांना अटक करण्यात आल्याबद्दल संताप व्यक्त केला. त्यानंतर तालुका अध्यक्ष संजय गवळी यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांची भेट घेऊन आगामी काळातील सर्व निवडणुकांमधील होणारे मतदान ही बॅलेट पेपरवर व्हावे अशी मागणी केली. त्यावेळी काँग्रेस कार्यकर्ते तालुका अध्यक्ष-संजय गवळी, अरविंद पाटील, मुकेश सुर्वे, दीनानाथ देशमुख, सूरज पंडित, अनंत देवळे, सुभाष मदन, संदीप पाटील, जकी नजे, मंगल माळी, गणपत सांगडे, विजय हरिश्चंद्र, पठाण चाचा संतोष सूरवसे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी काँग्रेस पक्षातर्फे देण्यात आलेल्या निवेदनात राज्य विधानसभेच्या निवडणुकीतील वाढलेल्या मतांबद्दल शंका घेतली.

काँग्रेस पक्षाने दिलेल्या निवेदनात नुकताच पार पडलेल्या निवडणुकांमध्ये संशयास्पद मतदान झाल्याचे आढळून आले. विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी काही दिवसापूर्वी त्यांच्या पत्रकार परिषदेमध्ये पुराव्यासहित स्पष्ट केले. मतचोरी होणे हा लोकशाहीचा खूप मोठा घात आहे. अशा प्रवृत्तीमुळे चुकीच्या लोकांचे राज्य देशात सत्तेत येते व देशाची प्रगती थांबते व नागरिक असंतुष्ट राहतात. त्यामुळे देशात अंतर्गत युद्ध, मांडणे, होण्याची व बराजकता माजण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही अशी भीती आपल्या अर्जात व्यक्त केली आहे. जर देशातील नागरिकांमध्ये आपापसात दोन गटात - समुहात बाद नको असतील शांतता सुव्यवस्था हवी असेल तर तत्काळ ई. व्ही. एम. मशीत बंद करण्यासाठी आपण अधिकारी वर्गाने पुढाकार घेऊन बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात याव्यात असे आदेश निवडणूक आयोगाला देण्यात यावा, या संदर्भात निवेदन देण्यात आले.

### ग्रामीण भागातील आंदोलक सहभागी

ई. व्ही. एम. विरोधात संपूर्ण देशात ग्रामीण भागात आंदोलन संसदेपर्यंत पोहवून सरकारची कानउघडणी करावी तसेच जनसमुदायाचा आक्रोश असल्याने पुढील निवडणुका या बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, अशी आग्रही मागणी केली. निवेदन देण्यासाठी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पायी चालत प्रशासकीय भवन येथे पोहोचले.

# निवडक

## स्मार्ट मिटरविरोधात तीव्र लढा देणार

**अलिबाग :** स्मार्ट मीटरच्या नावाखाली शासनाने सर्वसामान्यांची आर्थिक लुट सूरू केली आहे. ग्रामीण भागात स्मार्ट मीटर बसवण्याचा तगादा लावला जात आहे. त्याचा परिणाम वीज बील तिपटीने येत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. सर्वसामान्यांची लुट करणाऱ्या महावितरण कंपनीविरोधात तीव्र लढा देण्यात येणार असल्याचा इशारा शेकाप अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी दिला आहे. सक्तीच्या स्मार्ट मीटरविरोधात शेतकरी कामगार पक्षाने आक्रम भुमिका घेतली. त्यानंतर मीटर बसविणे थांबविण्यात आले होते. परंतु, छुप्या पध्दतीने गावोगावी जाऊन परस्पर जुने मीटर बदलून स्मार्ट मीटर महावितरण कंपनीमार्फत लावले जात आहे. अलिबाग तालुक्यातील अनेक गावांमध्ये स्मार्ट मीटर लावण्यात आला आहे. या स्मार्ट मिटरमूळे वीज बील तिप्पट आले आहे. सक्तीने बसविण्यात आलेले मीटर व भरमसाठ आलेले वाढीव वीजबील तात्काळ रद्द करा, खासगीकरणाचे पाऊल थांबवा, सर्वसामान्यांची होणारी आर्थिक पळवणूक खपवून घेणार नाही, अशा इशारा सुरेश घरत यांनी दिला आहे.




## उरण महाविद्यालयाचे यश

**उरण :** मुंबई विद्यापीठाच्या ५८ व्या सांस्कृतिक युवामहोत्सवामध्ये कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाला मुक अभिनय स्पर्धेत प्रथम क्रमांक तर भारतीय लोक नृत्य या स्पर्धेत उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला आहे. कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालय व उरण कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा युवा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेत एकूण २७ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. सदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तुषार गावरे, आकाश कांबळे, निखील पालांडे, गौरव रेळेकर यांनी केले. या युवा महोत्सवसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे, माजी प्राचार्य प्रा. किशोर शामा, यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाची सांस्कृतिक समितीचे प्रा. रियाज पठाण, प्रा. हन्नत शेख, प्रा. डॉ. आनंद गायकवाड, डॉ. अनुपमा कांबळे, प्रा. डॉ. मारोती लोणे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## लायन्स विजन सेंटरमध्ये नेत्र शिबीर

**मुरुड जंजिरा :** मुस्लिम महिला संघटना पेठ मोहल्ला मुरुड-जंजिरा व लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिरा, लायन्स क्लब ऑफ अलिबाग पोयनाड यांच्या संयुक्त विद्यमाने मुरुड येथील लायन्स विजन सेंटरमध्ये नेत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच माधवबाग खोपोली यांच्यातर्फे हेल्थ चेक अप कॅम्प आयोजित करण्यात आला होता. मुस्लिम महिला संघटनेच्या अध्यक्षा सफिना उलडे, तरन्नुम फराश, नाझीमा संदिलकर तसेच कमर कबले, तेहमीना फराश, तसनीम सियामवाला यांच्या पुढाकाराने आयोजन केले होते. दरम्यान या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी ६० रुग्णांची तपासणी करण्यात आली व त्यात आठ रुग्ण मोतीबिंदू असलेले निष्पण झाले. त्यांची पुढील आठवड्यात लायन्स फाऊंडेशन, चोंढी-अलिबाग येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. यावेळी लायन्स क्लब ऑफ मुरुड-जंजिराचे अध्यक्ष सनी सोगावकर, खजिनदार मकरंद कर्णिक, लायन्स सदस्य नयन कर्णिक व नैनिता कर्णिक तसेच लायन्स क्लब ऑफ अलिबाग पोयनाडचे अध्यक्ष गुरुनाथ माळी उपस्थित होते.



## विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप

**रसायनी :** बाबा ग्रुप ऑफ कंपनीचे डायरेक्टर पी. प्रभाकरन यांच्या वाढदिवसानिमित्त कैरे गावचे सुरेश पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपण समजाकरिता काही तरी देणे लागतो, या उदात्त हेतूने रायगड जिल्हा परिषद शाळा कैरे येथील शालेय विद्यार्थ्यांना स्वखर्चातून गणवेश वाटप केले. यावेळी विध्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला. कार्यक्रमप्रसंगी अविनाश पाटील, संतोष ठोंबरे, पद्माकर पाटील, उमेश ठोंबरे, नंदकुमार पाटील, हरेश पाटील, राकेश गोडीवले, रोहित मालकर, वसंत पाटील, वंदना जंगम, लता पाटील, विद्यार्थी, शिक्षक, मान्यवर उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **आमच्या येथे** J.S.W. (जिंदाल) कंपनीचे जुने नवीन कलर कोटेड पत्र्याचे पत्रे मिळतील. संपर्क : बाबू सैय्यद, कोळीवाडा कस्टम ऑफिसच्या बाजूला. मो. ७७४४९२५१६६
- **अलिबागमध्ये ऑफिस** कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- **दुकान गाळा भाड्याने** देणे आहे. अलिबाग एस टी स्टँन्ड जवळ ९७६४५४८६७९.
- **अलिबाग मधील रेस्टॉरंटसाठी** वेटर, कुक, इ. पाहिजे आहेत. तसेच किचन मॅनेजरची आवश्यकता आहे. इच्छुकांनी खालील फोन क्रमांकावर संपर्क साधावा. मोबाईल क्रमांक -७७६७८५३९९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक मेजर श्रवणकुमार लांबा, रा. पी-११, पेंटोपोलिस कुलाबा रोड, मुंबई-४०० ००५ यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पेठ, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| १८ | १/अ/२ | ०.२५.५० | ०.६२ |
| १८ | २ | ०.७२.५० | ०.४१ |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तकारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. १४/०८/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस.एल.एल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/२०२८५०८४९६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे सुरई, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या गवती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गजानन हरिभाऊ म्हात्रे, रा. थेरोंडा- डोऱ्याचीवाडी, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेल्या गवती मिळकतीपैकी अविभक्त हिस्सा माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| सुरई | २२६ | | ०-२६-१० | ०.४५ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-०१-६० | |
| | | एकूण | ०-२७-७० | |

वर नमूद मिळकत व या मिळकतीमधील ०-२७-७० हे. आर. गवती मिळकतीपैकी श्री. गजानन हरिभाऊ म्हात्रे यांचा असणारा अविभक्त हिश्श्या संदर्भात.

सबब सदरहू मिळकतीमधील विद्यमान मालक श्री. गजानन हरिभाऊ म्हात्रे यांनी त्यांचा असलेला हिस्सा निर्वेध असल्याचा निर्वाळा दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू बागायत व घर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १३/०८/२०२५

सही/-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार श्री. दशरथ तुकाराम साबळे आणि ब्रिजबिहारी माथुर यांनी मौजे. धामोते, ता, कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे मालक वेदांती सचिन जाधव यांचेकडून सदर खालीलप्रमाणे वर्णन केलेली बिनशेती मिळकत विकत घेणेचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ. मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ११२ | १० | ४१५-०० | ४१-५० |

सबब सदरबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक १४/०८/२०२५

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता - शॉप नं. ९, समर्थ
कृपा हौसिंग सोसायटी नेरळ,
महेश टॉकीज जवळ, नेरळ
ता, कर्जत, जि. रायगड
पिनकोड न. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राजेंद्र महादेव बोडके, रा. कर्जत, राज महेल बंगला, रूम नं. ३१६-२, सरकारी हॉस्पिटल जवळ, विठ्ठल नगर, ता. कर्जत, रायगड, ४१०२०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पोखरकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ११/८ | ०.६६.०० | ०.५९ | श्री. राजेश विनायक बांगवे |
| **एकुण क्षेत्रापैकी खरेदी क्षेत्र ०.२५.०० हे.आर.पॉ.** | | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १४/०८/२०२५.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास, नानामास्तर नगर,
मुद्रे . मो. नं. ७३८५००४८०६.

## जाहीर नोटीस (फक्त सभासदांसाठी)

### सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पुणे

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १६(३) ''नमुना ग'' ची नोटिस) (संदर्भ : मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाचे जा.क्र. पतसंस्था/सआ ५/ सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पुणे ता. हवेली जि. पुणे/विलिनीकरण/२०२५/१९२१/ दिनांक १२/०८/२०२५ चे पत्र)

सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पुणे ता.हवेली जि. पुणे या संस्थेचा नोंदणी क्रमांक-पीएनए (पीएनए)/आरएसआर/(सीआर)/७५३/९१-९२ नोंदणी दिनांक ०२/११/१९९१ अन्वये नोंदविण्यात आलेली आहे. सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पुणे ता.हवेली जि.पुणे संस्थेकडुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७ पोटकलम (१) च्या परंतुकाची खंड (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे सर्व सदस्य, धनको आणि हितसंबंध असलेल्या व्यक्ती यास नोटिस देण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ मधील नियम १६ मधील तरतुदीच्या अनुषंगाने आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग जि.रायगड या संस्थांचे एकत्रिकरण करण्यात दोन्ही संस्थांमध्ये प्रारूप चर्चा होऊन एकत्रिकरण करणेबाबत अंतिम निर्णय होणे बाकी आहे. नियोजित एकत्रिकरण मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण विभागणी किंवा रूपांतर यामुळे जिच्या हितसंबंधावर परिणाम झाला आहे अशा कोणत्याही व्यक्तीस तसेच सदर एकत्रिकरणाबाबत दोन्ही संस्थांच्या पदाधिकारी सभासद, इसम यांची कोणतीही हरकत दावे, मागणी येणे देणे असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १ महिन्याच्या आत सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे ता.हवेली जि.पुणे व आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग या दोन्ही संस्थांच्या मुख्य कार्यालयात लेखी निवेदनासह संपर्क साधावा. सदर जाहीर नोटीस दोन्ही पतसंस्थांच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर जाहीररित्या प्रसिद्ध केलेली आहे. तसेच विलिनीकरणाबाबतच्या अटी व शर्ती दोन्ही पतसंस्थांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केलेल्या असुन वर नमुद मुदतीत कोणतेही हरकत, दावे, मागणी, येणे देणे प्राप्त न झाल्यास संस्था एकत्रिकरणाबाबत पुढील कार्यवाही करणेत येईल या बाबत संबधितांनी नोंद घ्यावी.

**एकत्रिकरण योजनेचा मसुदा**

१) सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या, पुणे ता.हवेली जि.पुणे पतसंस्थेची सर्व येणी व मालमत्ता तसेच देणी व जबाबदारी आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग जि.रायगड च्या नावावर वर्ग करण्याबाबत.

२) सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या, पुणे ता.हवेली जि.पुणे या पतसंस्थेच्या भागधारकांना व ठेवीदारांना नियमाप्रमाणे देय असलेली देणी आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग जि.रायगड या पतसंस्थेत वर्ग करणेबाबत.

(३) सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या, पुणे ता.हवेली जि.पुणे पतसंस्थेच्या सर्व प्रकारच्या कर्जाच्या वसुलीची व ती रक्कम मिळवण्याचे अधिकार आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग जि.रायगड या पतसंस्थेस देणेबाबत व सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पुणे ता.हवेली जि. पुणे पतसंस्थेच्या थकित कर्जदारांचे विरुद्ध मिळालेले महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम १०१ अन्वये प्राप्त कर्जवसूली दाखल्यांचे व्याजासह कर्ज रक्कम वसूलीचे अधिकार आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग जि. रायगड या पतसंस्थेस देणेबाबत.

४) सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,पुणे ता.हवेली जि.पुणे पतसंस्थेच्या राखिव निधी व इतर निधी, ठेवी, कर्ज, बँक शिल्लक, बँक गुंतवणुक, रोख शिल्लक, वसुल भागभांडवल, संस्थेची कायम मालमत्ता, जंगम मालमत्ता व जप्त करण्यांत आलेली मालमत्ता, चालू असलेल्या विम्याचे लाभ आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग जि.रायगड या पतसंस्थेत वर्ग करणेबाबत.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १४/०८/२०२५

सही :- सही :-
**मुख्य कार्यकारी अधिकारी चेअरमन**
**सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पुणे ता.हवेली जि.पुणे**

**सही :- सही :-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी चेअरमन**
**आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड**

## ग्रामपंचायत पहेल,ता.माणगाव, जि.रायगड

ग्रामपंचायत पहेल १५ व्या वित्त आयोग व इतर योजनेअंतर्गत खालील प्रमाणे कामांसाठी दिनांक २१/०८/२०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सीलबंद दरपत्रक मागविण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र | कामांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १) | ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती | १००००० | १००० | २०० |
| २) | पहेल गाव अंतर्गत पायऱ्या बांधणे | ५०००० | ५०० | २०० |
| ३) | बापुजी मंदिराच्या समोर संरक्षण भिंत बांधणे | ८५००० | ८५० | २०० |
| ४) | रा.जि.पं.शाळा पावसाचे पाणी संकलन करणे | १०२६०० | १०२६ | २०० |

**अटी आणि शर्ती**

१. दरपत्रके प्रक्रियेच्या नियम व अटी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. अंतिम तारखेस दि.२१/८/२०२५ रोजी सकाळी ११.वा नंतर आलेली दरपत्रके घेतली जाणार नाही.
३. प्राप्त दरपत्रके दि.२२/८/२०२५ रोजी दुपारी १२ वा ग्रामपंचायत पहेल कार्यालयात उपस्थीतासक्षम सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील. नामंजूर दरपत्रकाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. व बिलाची रक्कम ग्रामपंचायतीकडील तरतुदीनुसार अदा करण्यात येईल.
४. साहित्य उत्तम दर्जाचे (आयेसाय/आयएसओ मार्क प्रमाणित) असावे, पुरवठादार जीएसटी नोंदणीकृत असावा.
५. कोणत्याही एक अथवा अनेक दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीचा राहील.

**सही /-**
**ग्रामसेवक**
**सौ. श्रेया सतीश ढेपे**
**ग्रामपंचायत पहेल**

**सही /-**
**सरपंच**
**सौ. करिश्मा प्रसाद मांजरे**
**ग्रामपंचायत पहेल**

## ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु. माणगाव, ता. माणगांव, जि. रायगड.

**जाहीर निविदा** दिनांक :-

ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु., खालील कामा करिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहर बंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे/वस्तूचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | काम पूर्ण करायचा कालावधी | निविदा सादर करणेचा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंतिम तारीख | वेळ | ठिकाण |
| १. | जलशुद्धीकरण व TCL खरेदी करणे | ३१०००/- | ३ महिने | २०/०८/२०२५ | स. १०.०० वाजेपर्यंत | ग्रा.पं. कार्यालय |

अटी व शर्ती :- १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि.२०/०८/२०२५ असून अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा. उपअभियंता (ग्रा.पा.पु/बांधकाम) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा. सरपंच ग्रा.पं. पळसगाव बु. यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

**सही/-**
**श्रीम. ऋतुजा बा. साळुंखे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पळसगांव बु. ता. माणगाव जि. रायगड**

**सही/-**
**सौ. सोनाली नि. आंब्रे**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पळसगांव बु. ता. माणगाव जि. रायगड**

## अलिबाग नगरपरिषद ता. अलिबाग, जि. रायगड

**जाहीर निविदा सन २०२५-२६**

अलिबाग नगरपरिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद यांचे संगणक विभागाकडून अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीतील नागरिकांसाठी नगरपरिषदेचे What-sapp Chatbot तयार करणे कामाकरीता द्विलिफाफा पद्धतीने जाहीर निविदा दर मागविणेत येत आहेत.

टिप :- वरील निविदेशी संबंधित अधिकृत माहिती व निविदा फॉर्मसाठी नगरपरिषद कार्यालयातील संगणक विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) संपर्क साधावा.

दिनांक : १४/०८/२०२५

स्वा/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद जि. रायगड

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

दिनांक : १४ ऑगस्ट २०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतींच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बीडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकती :-**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ. मीटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| बलजितसिंग दर्शनसिंह नारंग | ३० | २/अ | ०-७९-०० | ३ | ६० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४,
दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट,
हुतात्मा हिराजी पाटील चौक
(अंबिका नाका), पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

सही/-
**ॲड. अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :- १४/०८/२०२५
मो. नं. ९९२२३६८१२१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल खालील वर्णनाची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री.राजेंद्र जनार्दन पाटील रा.आर.पी. नगर, रामवाडी, पेण-रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन** जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे.दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा-धामणी ग्रामपंचायत वरवणे, मौजे-वरवणे येथील गट नं. १५२ एकुण क्षेत्र ०-२७-० हे.आर.चौ.मी. त्यासी आकार रु.०-१७ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-२७-० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहीत आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पेण-रायगड.
दि. १४/०८/२०२५.

सही /-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६.
तळ मजला, शिवाजी पथ.
पेण-रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्या अर्थी आमचे अशिल श्री मिलिंद जयसिंग गोळे व राजेश जयसिंग गोळे यांच्या मालकीची व वहिवाटीची मौजे कान्हीवली ता.सुधागड जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमीन मिळकत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे कान्हीवली ता.सुधागड, जि.रायगड येथील**

| सर्वे नं | एकूण आर.चौ.मी | आकार रु. पै |
|---|---|---|
| १८/१० | ३५-०० | ०.३५ |

सदर मिळकत आमच्या अशिलांनी १) बी. के. बोर्ड अँड पेपर इंडस्ट्रीजचे डायरेक्टर मधुकर कृष्णाजी कुलकर्णी २) आर.एन दत्त व ३) सीमा आर.दत्त तर्फे अखत्यारी म्हणून यांचेकडून दि. ०८/१२/१९९७ रोजी दस्त क्र.१७७३/९७ या खरेदी खताने खरेदी केली आहे. सदर खरेदी खताची मुळप्रत आमचे अशिलाकडून पाली ते पेडली प्रवासात गहाळ झाली आहे व त्याबाबत त्यांनी पाली (सुधागड तालुका) पोलीस स्टेशन जि.रायगड येथे तक्रार नोंदवली असून या तक्रारीचा क्र. असा आहे. म्हणून सदर गहाळ झालेल्या खरेदीखताच्या व सदर मिळकतीबाबत कुणाची हरकत, दावा, तक्रार, तारण, गहाण, दान, बोजा, पोटगी वा अन्य तत्सम कोणत्याही वहिवाटीचा दावा असल्यास त्या व्यक्तींनी त्यांच्याकडे असणाऱ्या कागदपत्रांसह लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खालील पत्त्यांवर सादर करावी. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती दाव्यांची दखल घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

वर उल्लेख केलेल्या सदर खरेदीखताच्या व सदर मिळकतीबाबत काही संपर्क साधावयाचा असल्यास पुढील पत्त्यावर साधावा.ही जाहीर नोटीस जनहितार्थ प्रसिद्ध केली.

पेडली
दिनांक ११/०८/२०२५

सही/-
**ॲड. जितेंद्र खोत**
पत्ता. मिलिंद जा गोळे
१०७ ब, भारतीय स्टेट बँक
शाखा-पेडली जवळ पो.तिवरे
ता. सुधागड जि.रायगड
भ.क्र ८०८७८६२३८५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री. काशिनाथ मोतीराम घारे यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

मौजे.उमरोली, तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

| मालकाचे नाव | भूमापन क्रं व उपविभाग/सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| श्री. काशिनाथ मोतीराम घारे | ६०/१ | ०-२६-८० पैकी ०-२०-०० | ०-६६ |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

ता. १४/०८/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
**ॲड. निलेश कान्हू मोरे मोबा. ९८२२६९११०९**
ऑफिस पत्ता - शॉप नं २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा
बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड.
कर्जत ता कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल खालील वर्णनाची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री.राजेंद्र जनार्दन पाटील रा.आर.पी.नगर, रामवाडी, पेण-रायगड व श्री.कृष्णा बारीक पाटील रा.नवखार, ता.अलिबाग, जिल्हा रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी सुरु आहेत.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे.दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा-धामणी ग्रामपंचायत वरवणे, मौजे-वरवणे येथील गट नं.१५३ एकुण क्षेत्र ०-२२-०० हे.आर.चौ.मी. त्यासी आकार रु. ०-१४ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर हरकत न आल्यास सदरची ०-२२-० हे.आर.चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहीत आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पेण- रायगड.
दि. १४/०८/२०२५

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६,
तळ मजला. शिवाजी पथ,
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक एव्हर ग्रीन वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन को.ऑप.सोसायटी लि.तर्फे सदस्य सौ.शैला विश्वास येरंडेकर यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २७ | ५ | २-०२-०० पैकी ०-४०-०० | २=६२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १३/०८/२०२५

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.गणपत परशुराम थोरवे यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे अंजप, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ८३/७/ब, यांचे एकुण क्षेत्र ०.५२.०० गुंठे मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : १४/०८/२०२५

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता.मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी : ९०२८५९२७९८

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. रमेश भाऊराव श्रोते यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे पेठ, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३०/६, यांचे एकुण क्षेत्र ०.०४.५० गुंठे मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १४/०८/२०२५

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-हालिवली, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| ज्यूवेल पिलिप्स डिसुझा | ११ | २ | ४-३०-०० | ४३.०० |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.


दि. १३/०८/२०२५

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो.९५९५२११८६७

# निवडक

## बेशुद्ध सापडलेल्या खेळाडूचे निधन

**बिजींग :** चीनमध्ये नुकतीच जागतिक स्पर्धा पार पडली असून त्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. इटलीचा २९ वर्षीय खेळाडू मतिया डेबर्टोलिस याचे निधन झाले आहे.



तो ओरिएंटियरिंग स्पर्धेचा भाग होता. गेल्या अनेक वर्षांपासून तो या क्रीडा प्रकारात सहभागी होत होता. मात्र, शुक्रवारी (दि.८) चेंगडू येथे झालेल्या मिडल डिस्टन्स प्रकारादरम्यान तो चक्कर येऊन पडला होता. त्यावेळी तो स्पर्धेच्या आयोजकांना बेशुद्ध अवस्थेत सापडला होता. त्यावेळी तिथे तीव्र उष्णता आणि ३० अंशापेक्षा अधिक तापमान होते. दरम्यान, डेबर्टोलिस याला तातडीने वैद्यकीय उपचार देण्यात आले होते. त्याला चीनमधील मोठ्या हॉस्पिटलमध्येही हलवण्यात आले होते. तिथे त्याच्यावर उपचार सुरू होते. मात्र, चार दिवसांनंतर अखेर त्याने अखेरचा श्वास घेतला. त्यामुळे क्रीडाविश्वातून हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, त्याच्या निधनामागील कारण अद्याप स्पष्ट करण्यात आले नाही.

## कुस्तीपटू सुशील कुमारला जामीन रद्द

**नवी दिल्ली :** ऑलिंपिक पदक विजेता आणि नामांकित कुस्तीपट्टू सुशील कुमार याला कनिष्ठ कुस्तीगीर सागर धनखरच्या हत्येप्रकरणात सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेला जामीन सर्वोच्च न्यायालयाने रद्द करत, अवघ्या सात दिवसांच्या आत आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले आहेत. मे २०२१ मध्ये दिल्लीतील छत्रसाल स्टेडियममध्ये माजी ज्युनियर राष्ट्रीय कुस्तीपटू सागर धनखर याची निर्दयपणे हत्या करण्यात आली होती. आरोपानुसार, सुशील कुमार आणि त्याच्या सहकाऱ्यांनी लाठ्यांनी मारहाण केली, ज्यामुळे सागरचा रुग्णालयात मृत्यू झाला. या घटनेत आणखी चार कुस्तीगीर जखमी झाले होते. जामीन रद्द होण्यामागील कारणेसागर धनखरचे वडील अशोक धनखर यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून सुशील कुमारचा जामीन रद्द करण्याची मागणी केली होती. त्यांचा आरोप आहे की, जामिनावर सुटल्यावर सुशील कुमारने साक्षीदारांवर दबाव टाकला आणि कुटुंबावर तडजोडीसाठी दडपण आणले. यासंदर्भातील व्हिडिओ पुरावे न्यायालयात सादर करण्यात आले, ज्यामुळे उच्च न्यायालयाचा निर्णय पलटला. या प्रकरणात दिल्ली पोलिसांनी सुशील कुमारसह १३ जणांवर गुन्हेगारी कट, अपहरण, दरोडा, दंगल, हत्येचा प्रयत्न, सदोष मनुष्यवध आणि हत्येचे गुन्हे दाखल केले आहेत. या खटल्यामुळे भारतीय कुस्ती क्षेत्र आणि कायदा यंत्रणा दोन्हींकडेच मोठे लक्ष वेधले गेले आहे.

## यजमान पुण्याची आगेकूच कायम



**पुणे :** जिल्हा बास्केटबॉल संघटना आयोजित ७५व्या कनिष्ठ (अठरा वर्षांखालील) गटाच्या राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात करण्यात आले आहे. या स्पर्धेत मुले व मुलींच्या गटातून यजमान पुण्याच्या संघांनी आपली आगेकूच कायम राखताना उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. या स्पर्धेत मुलींच्या गटात पुणे संघाने अहिल्यानगर संघावर १००-३९ असा ६१ गुणांनी विजय मिळविला. त्यात महत्त्वाचा वाटा लक्ष्मी जोशी (१९ गुण) व अक्षया पाटील (१७ गुण) हिचा होता. पुण्याने त्याआधी अनुषा सोनटक्के (१२ गुण) आणि आर्या पटागरेने (८ गुण) केलेल्या सुरेख खेळाच्या जोरावर परभणीचा ६९-८ असा पराभव केला होता. अपराजिता दासने केलेल्या सुरेख खेळाच्या जोरावर दक्षिण पूर्व मुंबई संघाने जळगांववर ५२-६ असा ४६ गुणांनी विजय मिळविला. अन्य लढतीत नांदेडने गोंदियाचा ४९-१, पालघरने चंद्रपूरचा १८-१, बीडने रायगडचा ३९-७, धुळे संघाने दक्षिण पश्चिम मुंबई संघाचा ३१-२६ असा पराभव केला. तसचे, मुलांच्या गटातून पुणे, कोल्हापूर, सातारा, नाशिक, नागपूर, मध्य मुंबई, दक्षिण पूर्व मुंबई, उत्तर मुंबई आणि मुलींच्या गटातून पुणे, मध्य मुंबई, उत्तर मुंबई, कोल्हापूर, नागपूर, ठाणे, नांदेड या संघांनी आपली आगेकूच कायम राखली आहे.

## कांगारूंची अपराजित मालिका खंडित

**डार्विन :** दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाला डार्विन टी-२० सामन्यात ५३ धावांनी पराभूत केले. मालिकेत आता १-१ अशी बरोबरी झाली असून तिसरा सामना निर्णायक ठरणार आहे. दक्षिण आफ्रिकेच्या या विजयामुळे ऑस्ट्रेलियाची अपराजित मालिका खंडितही झाली आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून टी-२० मालिका खेळत आहे. या मालिकेतील दुसरा सामना डार्विनला मंगळवारी (दि.१२) पार पडला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने यजमान ऑस्ट्रेलियाला ५३ धावांनी पराभूत करत मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. त्यामुळे आता तिसरा सामना निर्णायक ठरणार आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेसाठी युवा डेवाल्ड ब्रेव्हिस विजयाचा नायक ठरला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २१९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. परंतु, या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा डाव १७.४ षटकातच १६५ धावांवर संपुष्टात आला. ऑस्ट्रेलियाकडून सध्या तुफान फॉर्ममध्ये असलेल्या टीम डेव्हिडने या सामन्यातही मोलाचे योगदान दिले. मात्र, त्याला कोणाची साथ मिळाली नाही. पहिल्या सामन्यात त्याने ऑस्ट्रेलियाच्या विजयात महत्त्वाचा वाटा उचलला होता; परंतु, त्याला दुसऱ्या सामन्यात बाकी खेळाडूंकडून साथ मिळाली नाही. त्यामुळे अखेर ऑस्ट्रेलियाची टी-२० क्रिकेटमधील अपराजित राहण्याची मालिका १० व्या सामन्यात खंडित झाली. या सामन्यापूर्वी ऑस्ट्रेलियाने सलग ९ टी-२० सामने जिंकण्याचा पराक्रम केला होता.

# एकदिवसीय सामन्यांत हिटमॅनचा जलवा

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

वेस्ट इंडिज आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या एकदिवसीय मालिकेनंतर आता आयसीसी क्रमवारीतही बदल झाला आहे. यावेळी विशेष म्हणजे पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमला मोठा फटका बसला असून भारतीय एकदिवसीय संघाचा कर्णधार रोहित शर्माला काहीही न करता दुसऱ्या क्रमांकावर येण्याची संधी मिळाली आहे. तसेच, टी-२० आणि कसोटी क्रिकेटला अलविदा करणारा रोहित शर्मा आता एकदिवसीय क्रिकेटमध्ये पुनरागमनाची तयारी करत आहे. ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत रोहित परत येऊ शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे. त्याआधी त्याने त्याच्या तयारीत सुधारणा करण्यासाठी अभिषेक नायरची मदत घेतली आहे. नायर हा तोच व्यक्ती आहे ज्याने सुमारे १४ वर्षांपूर्वी रोहित शर्माला त्याची कारकीर्द पुन्हा रुळावर आणण्यास मदत केली होती.

### आयसीसीच्या क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर

### अगामी सामन्यांतील पुनरागमनासाठी शुभ संकेत

नुकत्याच आयसीसीने जाहीर केलेल्या ताज्या एकदिवसीय क्रमवारीत, भारतीय संघाचा सलामीवीर शुबमन गिल पहिल्या क्रमांकावर कायम आहे. गिलचे रेटिंग सध्या ७८४ आहे. गिलने काही काळापासून एकही एकदिवसीय सामना खेळला नसला तरी, त्याच्या खुर्चीला कोणताही धोका नाही. दरम्यान, भारतीय संघाचा एकदिवसीय कर्णधार रोहित शर्मा आता दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याचे रेटिंग ७५६ आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर भारतीय संघाने





एकही एकदिवसीय सामना खेळलेला नाही. दरम्यान, रोहितलाही न खेळता फायदा झाला आहे, त्याचे कारण बाबर आझम हा आहे. खरं तर बाबर आझम मागील क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर होता; परंतु, वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत बाबरची कामगिरी खूपच खराब होती. त्यानंतर बाबरची सरासरी खाली आली आहे. त्यासोबतच तो क्रमवारीतही खाली आला आहे. बाबर आझमचे रेटिंग आता ७५१ वर आले आहे.

दरम्यान, रोहित शर्मा २०२७चा विश्वचषक खेळणार की नाही, असे प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. मात्र, त्याची आयसीसी एकदिवसीय सामन्यातील क्रकमावरीतील दुसऱ्या क्रमांकावरची झेप ही रोहित शर्माला ट्रोल करणाऱ्यांच्या चांगलीच चपराक असेल. तसेच, अगामी एकदिवसीय सामन्यांसाठी रोहित शर्मा सज्ज झाला असून तो भारतीय संघातील सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर सोबत जिममध्ये सराव करत आहे. याबाबत रोहित शर्माने स्वतः सोशल मिडीयावर अपडेट दिली आहे. रोहित शर्मा आणि अभिषेक शर्मा हे आधी एकत्र खेळले आहेत आणि दोघांमध्ये खूप चांगली मैत्री आहे. तसेच, १४ वर्षांपूर्वी देखील नायरने

### रोहित मैदान परतण्याबद्दल गंभीर

**काही दिवसांपूर्वीच युनायटेड किंग्डममधील सुट्टीवरून परतणाऱ्या रोहित शर्माचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यावर लोकांनी रोहितला लठ्ठपणाबद्दल जोरदार ट्रोल करायला सुरुवात केली. परंतु, आता रोहित शर्माने स्वतः इंस्टाग्रामवर स्टोरी अपडेट केली आहे, ज्यामध्ये तो अभिषेक नायरसोबत जिममध्ये सराव करताना दिसत आहे. यावरून तो त्याच्या फिटनेसबद्दल आणि मैदानात परतण्याबद्दल गंभीर झाला आहे हे दिसून येते. तसेच, १४ वर्षांपूर्वीही अभिषेक नचयरने रोहित शर्माला प्रशिक्षण दिले होते. जेव्हा २०११ च्या विश्वचषक संघात रोहितची निवड झाली नव्हती. त्या काळात अभिषेक नायरने रोहितला त्याची फिटनेस आणि कौशल्य सुधारण्यास खूप मदत केली होती.**

रोहित शर्माला प्रशिक्षण दिले होते. त्यामुळे रोहित शर्माच्या दमदार पुनरागमनाची चर्चा सर्वत्र होत आहे.

## सीबीएसई ॲथलेटिक्स क्लस्टर मीटमध्ये जिंदल विद्यालयाचे यश

**| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |**

कोल्हापूर येथील संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूलमध्ये नुकत्याच पार पडलेल्या सीबीएसई ॲथलेटिक्स क्लस्टर मीटमध्ये एकूण १८२ शाळांच्या खेळाडूंमध्ये चुरशीच्या स्पर्धा रंगल्या होत्या. या स्पर्धेत साळावच्या जिंदल विद्या मंदिराच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत आपले वेगळेपण सिद्ध केले.





१२ वी विज्ञान शाखेतील सेजल प्रदीप मंडल हिने लाँग जंपमध्ये रौप्यपदक व १०० मीटर धावस्पर्धेत कांस्यपदक मिळवले. तिची लाँग जंपसाठी सीबीएसई नॅशनल ॲथलेटिक्स मीटमध्ये निवड झाली असून ती शाळेचे राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करणार आहे. इस्माईल असीम मुकदम (१२ वी विज्ञान) याने डिस्कस थ्रोमध्ये कांस्यपदक, तर सौद जलील मुकदम (१२वी विज्ञान) याने ज्यॅव्हलिन थ्रोमध्ये कांस्यपदक पटकावले. शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनीही खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## राशिदच्या नावावर नकोसा विक्रम

**| ओव्हल | वृत्तसंस्था |**

दी हंड्रेड लीगमध्ये मंगळवारी (दि.१२) मध्यरात्री रोमांचक सामना पाहायला मिळाला. ओव्हल इनव्हिझिबल्स विरुद्ध बर्मिंगहॅम फोनिक्स लढतीत लिएम लिव्हिंगस्टोनने मैदान गाजवले आणि फोनिक्स संघाने ४ गडी व २ चेंडू राखून सामना जिंकला. लिएमने २७ चेंडूंत ६९ धावांची नाबाद खेळी केली. त्याने राशिद खानच्या एका षटकात टोलेजंग फटके खेचले आणि अफगाणिस्ताच्या गोलंदाजाच्या नावावर नकोसा विक्रम नोंदवला गेला. लिव्हिंगस्टने राशिदच्या पाच चेंडूंवर २६ धावा चोपल्या.

## नृत्यस्पर्धेत पीएनपीची सान्वी प्रथम

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

ठाणे कलानंद नृत्य संस्थेच्यावतीने 'कलांजली उत्सव २०२५' या राष्ट्रीय स्तरावरील शास्त्रीय नृत्य स्पर्धेचे आयोजन ठाण्यातील दादा कोंडके ॲम्फीथिएटर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत कथक आणि भरतनाट्यम या प्रकारांत देशभरातील अनेक नृत्यांगनांनी सहभाग घेतला होता. या प्रतिष्ठित स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील वेश्वीतील पीएनपी होली चाईल्ड सीबीएसईच्या इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी सान्वी कार्वेकर हीने कनिष्ठ गटातील 'ज्युनियर ड्युएट' प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला आहे. देशभरातील दिग्गज नृत्यांगनांमध्ये हा मान मिळवल्याने सान्वीचे शाळा, पालक आणि गुरूंकडून कौतुक होत आहे. या यशाबद्दल सान्वी कार्वेकरचे पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह





चित्रलेखा पाटील यांच्यासह मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आदींकडून अभिनंदन करण्यात आले.

## 'पाकिस्तानविरुद्धच्या लढतीवर बहिष्कार टाकावा'

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंग याने भारतीय संघाला आशिया चषक स्पर्धेतील पाकिस्तानविरुद्धच्या लढतीवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले आहे. पाणी आणि रक्त एकत्रित वाहू शकत नाही, या विधानाची त्याने आठवण करून दिली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातले संबंध पुलवामा हल्ल्यानंतर अधिक ताणले गेले आहे आणि त्यामुळे पाकिस्तानसोबत कोणत्याच क्षेत्रात आघाडी नको, अशी जनभावना आहे. परंतु, त्याचवेळी आशिया चषक स्पर्धेत भारत विरूद्ध पाकिस्तान सामना होणार आहे आणि त्यावरून हरभनज सिंगने संताप व्यक्त केला आहे. आपल्या जवानांची, आपल्या लोकांची हत्या करत आहेत. दहशतवादी हल्ले होत आहेत, हा मुद्दा अद्याप सुटलेला नाही. या परिस्थितीत क्रिकेट खेळवणे योग्य नाही आणि प्रत्येक खेळाडूने देशाला सर्वप्रथम प्राधान्य देऊन पाकिस्तानविरुद्धच्या लढतीवर बहिष्कार टाकावा, असे आवाहन भज्जीने केले आहे.

## विंडीजने काढली पाकिस्तानची लाज

**| त्रीनीनाद | वृत्तसंस्था |**

वेस्ट इंडिजने ३४ वर्षांनंतर पाकिस्तानला २०२ धावांनी हरवत एकदिवसीय मालिका जिंकली आहे.त्यामुळे पाकिस्तान क्रिकेट संघाला बुधवारी (दि.१३) लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला. वेस्ट इंडिजचा कर्णधार शे होप आणि जेडन सील्स यांच्या शानदार कामगिरीने विजयाची पायाभरणी केली. जेडन सील्सने ७.२ षटकांत १८ धावांत ६ बळी घेत विक्रम रचला आहे. त्यामुळे वेस्ट इंडिजने घरच्या मैदानावरील तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली.



विंडीजने ३४ वर्षांनंतर प्रथमच पाकिस्तानविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकण्याचा पराक्रम केला आहे. कर्णधार शे होप व गोलंदाज जेडन सील्स या विजयाचे शिल्पकार ठरले. २३ वर्षीय गोलंजाद जेडन सील्सने ६ बळी घेताना विक्रमाला गवसणी घातली. पाकिस्तानविरुद्ध एक दिवसीय सामन्यात ६ बळी घेणारा तो विंडीजचा पहिलाच गोलंदाज ठरला आहे. त्याने सईम अयुब, अब्दुल्लाह शफिक, बाबर आजम, मोहम्मद रिझवान, हसन अली आणि नसीम शाह यांना बाद केले.

पाकिस्तानचा संघ ५० वर्षांच्या इतिहासात वेस्ट इंडिजविरुद्ध प्रथमच २०० किंवा त्याहून अधिक धावांनी हरला आहे. पाकिस्तान-वेस्ट इंडिज यांच्यात ११ जून १९७५ मध्ये पहिला एक दिवसीय सामना बर्मिंगहॅम येथे खेळवा गेला होता. २०१५ मध्ये वेस्ट इंडिजने

### ■ २०२ धावांनी विजय मिळवत मालिका खिशात

ख्राइसचर्च येथे जेसन होल्डरच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानवर १५० धावांनी विजय मिळवला होता. हा त्यांचा पाकिस्तानविरुद्धचा सर्वात मोठा विजय होता. मात्र, बुधवारी पाकिस्तानचा संघ २०२ धावांनी हरला. एक दिवसीय क्रिकेट इतिहासात पाकिस्तानचा संघ चारवेळा २०० किंवा त्याहून अधिक धावांनी पराभूत झाला आहे. २००९ मध्ये श्रीलंकेने त्यांना २३४ धावांनी पराभूत केले होते आणि हा त्यांचा सर्वात लाजीरवाणा पराभव ठरला होता.





## वॉकेथॉनच्या माध्यमातून स्वच्छतेवर जनजागृती

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत नागाव पर्यटन संस्था व रोटरी क्लब ऑफ अलिबाग सी शोअर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.१३) नागाव वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी नागावकरांनी नागाव हायस्कुल ते नागाव हटाळे बाजार अशी रॅली काढत स्वच्छ नागावसाठी पुढाकार घेतला. या रॅलीत नागावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य आदींसह इतर मान्यवर, विद्यार्थी आणि नागरीक उपस्थित होते.

पर्यटनात्मक दृष्या अत्यंत नावलौकिक मिळवलेल्या नागावला अधिक सुंदर व स्वच्छ ठेवण्याच्या उद्देशाने नागावकर यावेळी स्वयंस्फुर्तीने एकवटले होते. या वॉकेथॉनमध्ये स्वच्छ नागावचा नारा देत कचरा व्यवस्थापनाचे महत्व पटवून दिले. तसेच, सदृढ व निरोगी आरोग्यासाठी चालणे किती महत्वाचे आहे, हे देखील यावेळी सांगण्यात आले. यावेळी झिरो वेस्ट मॅनेजमेंट संकल्पना साकार करण्यासाठी ओला व सुका कचरा विलगीकरण करून इतरत्र कुठेही न टाकता घंटा गाडीचा वापर करण्याबाबत नागरिकांना आवाहन करण्यात आले. या रॅलीत सहभागी झालेल्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

### बुची बाबू क्रिकेट स्पर्धा मुंबईच्या संघाची घोषणा

## कर्णधारपदी आयुष म्हात्रेची निवड

**| मुंबई | प्रतिनिधी |**

बुची बाबू स्पर्धेसाठी युवा आयुष म्हात्रेला मुंबई संघाचे नेतृत्व देण्यात आले आहे. तर, सुवेद पारकरला उपकर्णधारपदाची जबाबदारी मिळाली आहे. मुंबई संघात एकूण १७ खेळाडूंना संधी मिळाली आहे. त्यापैकी भारतीय संघाकडून खेळलेले अनुभवी सरफराज खान आणि त्याचा भाऊ मुशीर खान यांनाही संधी मिळाली आहे. तामिळनाडू क्रिकेट असोसिएशनने आयोजित केलेली बुची बाबू स्पर्धा १८ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर दरम्यान चेन्नई येथे खेळवली जाणार आहे.

१८ वर्षीय आयुष महात्रेने काही काळातच चांगली कामगिरी केली आहे आणि आपली क्षमता सिद्ध केली आहे. त्याने इंग्लंड दौऱ्यावर गेलेल्या भारतीय अंडर-१९ संघाचेही नेतृत्व केले आहे. त्याच्या नेतृत्वाखाली अंडर-१९ संघ नंतर ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे. आता भारतीय क्रिकेटमध्ये त्याची प्रतिष्ठा हळूहळू वाढत आहे. आयुष म्हात्रे आयपीएल २०२५ च्या लिलावात विकला गेला नाही. त्यानंतर, चेन्नई सुपर किंग्जचा ऋतुराज गायकवाड हंगामाच्या मध्यात जखमी झाला. त्यानंतर आयुष महात्रेला सीएसके संघात प्रवेश मिळाला. त्यानंतर त्याला खेळण्याची संधी मिळाली. त्याने आयपीएल २०२५ च्या ७ सामन्यांमध्ये एकूण २४० धावा केल्या, ज्यामध्ये एक अर्धशतक होते आणि त्याचा सर्वोच्च धावसंख्या ९४ धावा होता.

दुसरीकडे, इंग्लंड दौऱ्यासाठी सरफराज खानची भारतीय कसोटी संघात निवड झाली नाही. आता तो येथे चांगली कामगिरी करून निवडकर्त्यांचे लक्ष वेधू इच्छित आहे. सर्फराजने आतापर्यंत ६ कसोटी सामन्यांमध्ये एकूण ३७१ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये एक शतक आणि तीन अर्धशतकांचा समावेश आहे.

### मुंबईचा संघ

**आयुष म्हात्रे (कर्णधार), मुशीर खान, दिव्यांश सक्सेना, सरफराज खान, सुवेद पारकर (उपकर्णधार), प्रग्नेश कनपिल्लेवार, हर्ष अघव, साईराज पाटील, आकाश पारकर, आकाश आनंद (यष्टीरक्षक), हार्दिक तमोरे (यष्टीरक्षक), श्रेयस गुरव, यश डिचोलकर, हिमांशू सिंह, रॉयस्टन डायस, सिल्वेस्टर डिसूजा आणि इरफान उमैर.**



## सुरेश रैनाला ईडीचा समन्स

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय क्रिकेट विश्वात एक खळबळजनक घडना घडली आहे. माजी भारतीय क्रिकेटपटू सुरेश रैना यांना प्रवर्तन संचालनालयाने (ईडी) समन्स बजावले असून, त्याची अवैध सट्टेबाजी ॲप प्रकरणात चौकशी होणार आहे. १एक्सबेट नावाच्या सट्टेबाजी ॲपशी संबंधित प्रकरणात रैना यांच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, यामुळे क्रिकेटप्रेमींसह संपूर्ण देशात चर्चेला उधाण आले आहे. मिळालेल्या माहितीनुसर, सुरेश रैना यांनी या ॲपच्या जाहिरातींद्वारे त्याच्याशी संबंध प्रस्थापित केले होते. ईडीने या प्रकरणात रैनाला समन्स बजावले असून, बुधवारी (दि.१३) त्यांना दिल्लीतील ईडी कार्यालयात हजर राहण्यास सांगितले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)